## सभागृहाची वेळ पाळणे सर्वांची जबाबदारी -जगदीप धनखड



**नवी दिल्ली** : आपण साऱ्या पक्षांच्या नेत्यांना बोलण्यासाठी पुरेसा वेळ देण्याचा प्रयत्न करू, मात्र निर्धारित वेळ पाळणे ही तुमचीही जबाबदारी आहे, असे जगदीप धनखड यांनी हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी बुधवारी (दि. ७) बजावले. संसदेचे हिवाळी अधिवेशन बुधवारपासून सुरू झाले. राज्यसभाध्यक्ष म्हणून धनखड यांनी आजच सूत्रे स्वीकारली, मात्र वेळ न पाळणाऱ्यांसाठी पहिल्या दिवशीच त्यांनी कडक भूमिका घेतल्याचे पहिल्याच दिवशी दिसले, तर नवे राज्यसभाध्यक्ष म्हणून जगदीप धनखड यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यसभा आपला समृध्द वारसा केवळ पुढे नेणार नाही, तर नवीन उंचीवर नेईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.


गुरुवार, ८ डिसेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक १४०

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


### अंतरंग


...अन्यथा आमचा संयम सुटेल -बावनकुळे/२

नितळस ग्रामस्थांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश/३

मीराबाई चानूने ऑलिम्पिक विजेतीला दिली मात/८


### महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी केंद्राकडून दखल

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह घालणार लक्ष

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न पुन्हा एकदा धुमसू लागला आहे. कर्नाटकने महाराष्ट्राच्या काही गावांवर दावा सांगितल्यानंतर या वादाची ठिणगी पडली. त्यानंतर महाराष्ट्रातील काही वाहनांची कर्नाटकमध्ये तोडफोडही करण्यात आली. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. ७) सकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी संपर्क साधून सीमाप्रश्नावर तसेच गेल्या आठवड्यातील घडामोडींची संपूर्ण माहिती दिली.



गृहमंत्री अमित शहा यांनी सीमावादप्रश्नी गांभीर्याने लक्ष घालणार असल्याचे आश्वासन या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

दोन्ही राज्यांतील तणाव कमी करण्यासाठी हालचालींना वेग आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्याशी फोनवरून संवाद साधला. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना फोन करीत राज्यातील परिस्थितीविषयी शाह यांना माहिती दिली. कर्नाटक सरकारची मुजोरी आणि सीमाभागात महाराष्ट्रातील वाहनांवर होणाऱ्या हल्ल्यांबाबतही त्यांनी शाह यांना माहिती दिली. त्यानंतर शाह यांनी आपण या प्रश्नात गांभीर्याने लक्ष घालणार असल्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्राविरोधात सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्या बसवराज बोम्मई यांना अमित शहा समज देणार का आणि या वादावर पडदा पडणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> **माझी कालच कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली. दोन्ही राज्यांमधील तणावामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहून सामान्यांना त्याचा त्रास होऊ नये, याची दक्षता घ्यावी याबद्दल आवाहन केले आहे. त्यांनी ते मान्य केले आहे.**
>
> **-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

### कन्नड रक्षण वेदिकेचा निषेध

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे, पण कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी वारंवार आक्षेपार्ह वक्तव्य करून सीमावाद वाढविला आहे. त्यात कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांकडून मंगळवारी बेळगावातील हिरेबागवाडी टोलनाक्यावर महाराष्ट्रातल्या वाहनांची तोडफोड करण्यात आली होती. दरम्यान, महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये कर्नाटक सरकारने केलेल्या निषेधाचे पडसाद पडत असल्याचे पहायला मिळत आहे. पुणे, औरंगाबाद, सोलापूर या ठिकाणी कर्नाटक परिवहन महामंडळाच्या प्रवासी बसला काळे फासून बोम्मई सरकार आणि कन्नड रक्षण वेदिके संघटनेचा निषेध नोंदविला.

## कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी तोंडास आवर घालावा -राज ठाकरे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र -कर्नाटक सीमावाद पुन्हा एकदा पेटल्याचे दिसत आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्याकडूनही वादग्रस्त वक्तव्ये सुरूच आहेत. अशातच मंगळवारी बेळगावजवळ हिरेबागवाडी टोल नाक्याजवळ महाराष्ट्राच्या वाहनांवर कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांकडून हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांना सूचक इशारा दिला आहे.



राज ठाकरे म्हणाले, कर्नाटक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांना कलह हवाय आणि त्यासाठी महाराष्ट्राला जाणूनबुजून लक्ष्य केले जातेय. महाराष्ट्राने जे काही मिळवले आहे ते संघर्ष करून मिळवले आहे. त्यामुळे संघर्षाला आम्ही तयार असतो. याशिवाय राज ठाकरे यांनी ट्विटर आणि फेसबुकवर एक पत्रही पोस्ट केले आहे. राज ठाकरे म्हणतात, मी मध्यंतरी बोललो तसं, महाराष्ट्र-कर्नाटकाचा सीमावाद उफाळून यावा, यासाठी पुन्हा कोणाकडून तरी प्रयत्न सुरू झाले आहेत. तिकडून कोण खतपाणी घालतेय हे तर उघड दिसतेय, पण इथे कोण याला खतपाणी घालत आहे का? हे सरकारने पहायला हवे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी आता जरा तोंडावर आवर घालावा आणि हा प्रश्न चिघळू देऊ नये. महाराष्ट्राच्या गाड्यांची तोडफोड, तिथल्या मराठी माणसांना त्रास असले प्रकार सुरू आहेत ते तत्काळ थांबवा.

याशिवाय हा प्रश्न चर्चेने आणि सामोपचारानेच सुटायला हवा, पण जर समोरून संघर्षाची कृती केली जाणार असेल तर, मात्र महाराष्ट्र नवनिर्माण सेना काय करू शकते. याची चुणूक माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी दाखवली आहे. त्यामुळे गरज पडली, तर आमचे उत्तर पण तितकंच तीव्र असेल हे विसरू नका, असा इशाराच त्यांनी दिला आहे.

## ठेवीदारांचे पैसे परत करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम करा -मुख्यमंत्री

### पेण अर्बन बँक गैरव्यवहारप्रकरणी बैठकीत निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील आर्थिक गैरव्यवहारांमुळे गरीब खातेदार आणि ठेवीदारांचे मोठे नुकसान झाले आहे. कोणत्याही परिस्थितीत गरीबांचे पैसे परत मिळाले पाहिजे यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी कालबद्ध कार्यक्रम तयार करा, या जप्त मालमत्तांचा लवकरात-लवकर लिलाव करून पैसे वसूल करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. ७) दिले.



पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील ठेवीदार आणि खातेदार संघर्ष समितीच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. सह्याद्री अतिथीगृहात आयोजित या बैठकीस आमदार महेंद्र थोरवे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, विभागीय सहनिबंधक आप्पाराव घोलकर यांचेसह महसूल, पोलीस, सहकार, आर्थिक गुन्हे शाखा आणि सक्तवसुली संचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते.

बँकेच्या अध्यक्ष, संचालक मंडळाच्या आर्थिक गैरव्यवहारामुळे ठेवीदारांच्या ठेवींची मुदत संपली तरीही त्या परत मिळण्याची शक्यता नव्हती, त्यामुळे या ठेवींमधून घेतलेल्या ३९ मालमत्ता गृहविभागाने जप्त केल्या आहेत. महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण अधिनियमातील तरतुदीनुसार या मालमत्ता जप्त केल्या आहेत. ठेवीदारांच्या पैशांमधून घेतलेल्या जागा सिडकोने खरेदी करून ठेवीदारांचे पैसे परत देण्याचा एक पर्याय असून त्यादृष्टीने या जागांचे सिडकोने मूल्यांकन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी दिले. ठेवीदारांची सुमारे ६११ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची देणी असून हे सगळे गरीबांचे पैसे आहेत, ते त्यांना मिळालेच पाहिजेत, त्यासाठी जप्त मालमत्तांचा लिलाव करा, वसूली करा आणि हे पैसे परत करा, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सिडकोने या जप्त मालमत्तांचे मूल्यांकन तातडीने करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देशही यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांना दिले.

बँक आर्थिक गैरव्यवहारातील वसुलीसाठी मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेल्या विशेष कृती समितीने केवळ २९.१० कोटी रुपये वसूल केले आहे. या वसुलीला गती देण्यासाठी विभागीय सहनिबंधकांनी जिल्ह्यातील इतर निबंधकांचे सहकार्य घ्या, जिल्हाधिकारी, पोलीस, आणि सहकार अधिकाऱ्यांनी कालबद्ध कार्यक्रम तयार करुन जप्त केलेल्या १२१ मालमत्तांचा लिलाव करुन वसुली करण्यास गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

गरीब ठेवीदारांना त्यांच्या श्रमाचा पैसा मिळालाच पाहिजे. त्यासाठी प्रशासकांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडावी, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. सक्तवसुली संचालनालयाने जप्त केलेल्या मालमत्तांच्या ७/१२ उताऱ्यांच्या इतर हक्कामध्ये मालमत्तेची विक्री व हस्तांतरण करण्यात येऊ नये असा शेरा नोंदविला आहे. यामुळे मालमत्तांच्या विक्रीला अडचण येत असून हा शेरा मागे घेण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## निवडक

### जळगावात भरधाव ट्रॅक्टरची आठ वाहनांना धडक

**जळगाव** : अवैध वाळू वाहतुकीवर कारवाईच्या भीतीने ट्रॅक्टर सुसाट पळवणाऱ्या चालकाने सात ते आठ जणांना धडक दिली. ही घटना मंगळवारी (दि. ६) दुपारी जळगाव शहरातील खोटे नगर स्टॉपजवळ घडली. या अपघातात पाच दुचाकीस्वार जखमी झाले असून त्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर चालक ट्रॅक्टर सोडून पसार झाला. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

### बांगलादेशची भारतीय संघावर पुन्हा एकदा मात

**ढाका** : भारत व बांगलादेशमध्ये झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यातही बांगलादेशने पाच धावांनी विजय मिळविला. रोहित शर्मा बांगलादेशची फलंदाजी सुरू असताना झेल घेण्याच्या प्रयत्नात दुखापतग्रस्त झाला, तरी तो फलंदाजीसाठी आला. त्याने अर्धशतक करत २८ चेंडूत नाबाद ५१ धावा केल्या, मात्र त्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले.

## मुंबईचा कायापालट होणार!

### सौंदर्यीकरणाचा बैठकीत घेतला आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या वैभवात भर घालेल, अशाप्रकारे सौंदर्यीकरणाचे काम हाती करून मुंबईचा कायापालट करावा. मिशन मोडवर हे काम हाती घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. ७) बैठकीत दिले आहेत. दरम्यान, गुरुवारी (दि. ८) मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते सुमारे १८७ कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुंबईच्या सौंदर्यीकरणाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला. या वेळी विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह खासदार राहुल शेवाळे, आमदार आशीष शेलार उपस्थित होते.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या वेळी म्हणाले, मुंबई सुशोभीकरणाच्या कामाला गेल्या चार महिन्यात वेग देण्यात आला आहे. रस्त्यांचे काँक्रीटीकरण, कोळीवाड्यांचे सौंदर्यीकरण, आपला दवाखाना यांसारख्या निर्णयांमुळे गतिमान मुंबईच्या वैभवात भर पडणार आहे. स्वच्छता या विषयाला प्राधान्य देऊन दृष्य स्वरूपात बदल दिसावे यासाठी मुंबई सुंदर करण्यासाठी पाच हजार स्वच्छतादूतांची नेमणूक करावी. शहरातील महत्त्वाच्या इमारतींवर रोषणाई करावी, महत्त्वाचे रस्ते, चौक, स्कायवॉक, फ्लायओव्हर यांचे सुशोभिकरण करावे, मिशन मोडवर हे सर्व काम हाती घ्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. **(पान २ वर...)**

## महाराष्ट्र-कर्नाटक एसटी सेवेवर परिणाम

**मुंबई : प्रतिनिधी**

बेळगावमधील हिरे बागेवाडी टोल नाक्याजवळ कन्नड संघटनांकडून महाराष्ट्रातील ट्रकवर दगडफेक करण्यात आली. या आंदोलनाचा एसटीच्या सेवांवरही परिणाम झाला. महाराष्ट्रातील विविध भागांतून कर्नाटकात जाणाऱ्या आणि येणाऱ्या १४५ एसटी फेऱ्या मंगळवारी रद्द करण्यात आल्या.

कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी यांसह अन्य काही जिल्ह्यांतून कर्नाटकसाठी दररोज ३३० एसटी फेऱ्या होतात. तेवढ्याच फेऱ्या पुन्हा कर्नाटककडे रवाना होतात. कन्नड संघटनांकडून करण्यात आलेल्या आंदोलनामुळे एसटीच्या वाहतुकीवर परिणाम झाला. एकूण १४५ एसटी फेऱ्या रद्द करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कर्नाटकातून महाराष्ट्रात येणाऱ्या परिवहन सेवाही थांबवण्यात आल्या आहेत.

गोव्याहून मुंबईसाठी येणाऱ्या खासगी प्रवासी बसवर मंगळवारी बेळगावजवळ दगडफेक करण्यात आल्याची माहिती मुंबई बसमालक संघटनेचे अध्यक्ष हर्ष कोटक यांनी दिली. प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेऊन गोव्याला जाणाऱ्या किंवा तेथून येणाऱ्या बस या कोल्हापूरमधील राधानगरी आणि गगनबावडामार्गे वळवण्यात आल्या आहेत.

## माथेरानच्या घाटात बिबट्याचा वावर

### धसवाडीतील बैलाची शिकार

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानच्या डोंगरातील बिबट्याचा वावर वाढला असून घाटात बिबट्याने टॅक्सीचालकाला दर्शन दिले असून धसवाडीमधील बैलाची शिकार केली आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



(संग्रहित छायाचित्र)

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील धसवाडी भागातील शेतकरी हरिदास लक्ष्मण आखाडे यांच्या बैलाची शिकार बिबट्याने केली. नेहमीप्रमाणे पहाटेच्या सुमारास चरायला सोडलेल्या जनावरांपैकी एका बैलवार बिबट्याने हल्ला करून त्याला ठार मारले आहे. जंगलात सकाळी गवत कापण्यासाठी गेलेले असताना हरिदास आखाडे यांना बैल मतृावस्थेत आढळून आला. याबाबतची माहिती मिळताच वनक्षेत्रपाल उमेश जंगम, वनपाल एस. एच. म्हात्रे यांनी घटनस्थळाची जाऊन पंचनामा केला.

नेरळ-माथेरान टॅक्सीसेवा देणाऱ्या वाहनचालक राकेश पाटील यांनादेखील सोमवारी रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास लव्हाळवाडी भागातून थेट घाटरस्त्यावर आलेला बिबट्या गाडीच्या प्रकाशात रस्त्यावर काही काळ थांबला. त्यानंतर मार्ग न दिसल्याने बिबट्या आल्या पावली पुन्हा लव्हाळावाडीकडे खाली उतरून परत गेला होता.



पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कृतज्ञता सप्ताहाचे उद्‌घाटन बुधवारी संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमास जनरल बॉडी सदस्य व स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन अरुणशेठ भगत, 'रयत'चे माजी सचिव डॉ. गणेश ठाकूर, विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर, अनंताशेठ ठाकूर, प्रमोद कोळी, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य साधना डोईफोडे, सुधीर ठाकूर, जयवंत देशमुख, नामदेव ठाकूर, विश्वनाथ कोळी, सुरेश पाटील, सहाय्यक विभागीय अधिकारी फडतरे आदींसह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते.

## माथेरानमधील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा बाळासाहेबांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान नगर परिषदेच्या निवडणुका जवळ येत असल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. कर्जत-खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या निवासस्थानी उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, कर्जत तालुकाप्रमुख संभाजी जगताप, माजी उपसभापती मनोहरशेठ थोरवे, माथेरान शिंदे गटाचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, उपशहर प्रमुख प्रमोद नायक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये माथेरानमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या १६ कार्यकर्त्यांनी बुधवारी (दि. ७) जाहीर प्रवेश केला.

यामध्ये किशोर कदम, नितेश कदम, जगदीश कदम, सचिन काळे, दीपक सोनावणे, आकाश कांबळे, अतुल कारंडे, गणेश माने, शशिकांत माने, राजू वर्पे, उमेश कदम, ओंकार ननावरे, प्रसाद सोनावणे, सूर्यकांत सोनावणे, प्रवीण कांबळे, महेश काळे यांनी प्रवेश केला आहे.



आमदार महेंद्र थोरवे, शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी व उपशहर प्रमुख प्रमोद नायक यांच्या कार्यपद्धतीवर खुश होऊन आम्ही बाळासाहेबांच्या शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. बाळासाहेबांच्या शिवसेनेत विविध प्रभागातील कार्यकर्त्यांचा ओघ वाढत असून आगामी नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये फायदा होईल, असा विश्वास चंद्रकांत चौधरी यांनी व्यक्त केला आहे.

> **गेली २० वर्षे आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नि:स्वार्थीपणे काम करीत होतो, परंतु माजी नगरसेवक स्व. दयानंद डोईफोडे होते, तोपर्यंत सर्व काही व्यवस्थित आणि सुरळीत होते. त्यांच्यानंतर आम्हाला सतत डावलले जात होते. तरुणांना योग्य नेतृत्व नसल्यामुळे आम्ही सर्वांनी एकमताने चंद्रकांत चौधरी व प्रमोद नायक यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आज बाळासाहेबांची शिवसेना पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे.**
>
> **-नितेश कदम, कार्यकर्ते, माथेरान**

# ...अन्यथा आमचा संयम सुटेल

## भाजप प्रदेशाध्यक्षांचा संजय राऊतांना इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

खासदार संजय राऊत यांनी सीमावादप्रश्नी चिथावणी देणे आणि आव्हान देणे बंद केले पाहिजे, अन्यथा संयम सुटेल आणि भारतीय जनता पार्टी रस्त्यावर उतरेल, असा खणखणीत इशारा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. ७) मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलताना दिला.

ते म्हणाले की, संजय राऊत यांनी आव्हान देऊ नये, राज्याचे राजकीय वातावरण खराब करू नये आणि सामाजिक वातावरण बिघडवू नये, अन्यथा लोकांचा संयम सुटेल. यातून उद्या उद्रेक झाला तर थांबविता येणार नाही. कोणत्याही नेत्याचा व्यक्तिगत अपमान होईल, असे संजय राऊत यांनी बोलू नये. मर्दानगी काढणे, नालायक म्हणणे हे महाराष्ट्र सहन करणार नाही. राऊत यांनी चिथावणी देणे बंद करावे. नाही तर त्यांच्या बोलण्याचा उलटा परिणाम होईल.



महाराष्ट्र –कर्नाटक सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यावर न्यायालयातच तोडगा निघेल. न्यायालयाने लवकरात लवकर सुनावणी करून या प्रकरणी निर्णय द्यावा यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत, असे आपले आवाहन आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.

ते म्हणाले की, या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयातच तोडगा निघेल हे माहिती असूनही राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपण स्वतः सीमाभागात जाणार असल्याचे जाहीर करणे शोभत नाही. त्यांना सीमाभागात जायचे होते तर ते आधी का गेले नाहीत, असा प्रश्न निर्माण होतो.

जी २० संबंधी बैठकीस निमंत्रण असूनही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गैरहजर राहिले. त्यांनी महाराष्ट्राच्या हितापेक्षा अधिक महत्त्व स्वतःच्या राजकारणाला दिले व महाराष्ट्राचा अपमान केला, असेही त्यांनी सांगितले.

**तोंड आवरा नाहीतर जेलमध्ये जाल** –मंत्री शंभूराज देसाई

**महाराष्ट्र–कर्नाटक सीमावादाप्रश्नी खासदार संजय राऊत यांनी सत्ताधारी शिंदे–फडणवीसांवर आसूड ओढले होते. त्यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना मंत्री शंभुराज देसाई यांनी राऊतांना थेट जेलमध्ये जाल, असा इशाराच दिला. महाराष्ट्र–कर्नाटक सीमावादाबाबत संजय राऊत हे एकनाथ शिंदे यांच्यावर नाहक आरोप करीत आहेत, त्यांनी आपले तोंड आवरावे. तुम्ही साडेतीन महिन्यांचा आराम करून बाहेर आला आहात. बाहेरचे वातावरण तुम्हाला सूट होत नाही, असे तुमच्या बडबडण्यावरून वाटत आहे. तुम्हाला पुन्हा आराम करण्याची वेळ येऊ नये. त्यासाठी अशी वक्तव्ये करणे टाळा, असा इशाराच शंभुराज देसाई यांनी दिला होता.**

## पैसे तिप्पट करण्याच्या आमिषाने फसवणूक करणारी टोळी गजाआड

**ठाणे : प्रतिनिधी**

पैसे तिप्पट करण्याचे आमिष दाखवून २५ लाख रुपये लुटणाऱ्या टोळीतील सहा जणांना टिळकनगर पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी या आरोपींकडून सुमारे पावणेसात लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

ठाणे परिसरात राहणाऱ्या तक्रारदाराची काही दिवसांपूर्वी या टोळीतील एका आरोपीसोबत ओळख झाली होती. तक्रारदाराकडून २५ लाख रुपये घेऊन त्याला ७५ लाखांच्या बनावट नोटा देण्याचे अमिष आरोपीने दाखविले होते. तक्रारदार २५ नोव्हेंबर रोजी २५ लाख रुपये घेऊन घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालय परिसरात पोहोचला होता. आरोपींनी तक्रारदारकडून २५ लाख रुपयांची बॅग घेतली आणि पोलीस आल्याचा बहाणा करून पोबारा केला.

याप्रकरणी तक्रारदाराने टिळकनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून गुन्ह्यात वापरलेली रिक्षा ताब्यात घेतली. त्यानंतर पोलिसांनी अर्षद खान (३२), अल्ताफ खान (२५), अकबर शेख (५०), नईम शेख (४३), इम्तियाज खान (३२) आणि रवींद्र खंडागळे (५२) या सहा जणांना घाटकोपर येथून अटक केली. आरोपींकडून रोख पाच लाख २३ हजार रुपये, एक रिक्षा आणि दोन दुचाकी असा एकूण सहा लाख ७५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला असून अन्य एका आरोपीचा शोध घेत आहेत.

## रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये मतदार नोंदणी शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्यशास्त्र महाविद्यालयात ६ व ७ डिसेंबर रोजी मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.



महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत या शिबिरासाठी पनवेल तहसील कार्यालयामधून नायब तहसीलदार एकनाथ नाईक व महसूल अधिकारी सारिका आव्हाड तसेच मतदान आयोगाचे इतर कर्मचारीसुद्धा या शिबिरासाठी उपस्थित होते.

या मतदार नोंदणी शिबिरासाठी महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड हे उपस्थित होते. त्यांनी भारतीय लोकशाहीत मतदानाचे असणारे महत्त्व समजून सांगितले व मतदार नोंदणीसाठी शुभेच्छा दिल्या व प्रोत्साहन दिले.

या शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. प्रथमेश ठाकूर तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. भाग्यश्री शुक्ला, प्रा. प्रतीक्षा पाटील प्रा. कावेरी घोगरे व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सहकार्य केले.

## सानपाडामधील नागरिकांना सोयीसुविधा द्यावी –दशरथ भगत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा–सोनखरमधील ४० हजारांहून अधिक शहरी लोकसंख्या असणाऱ्या नागरिकांना सिडकोने मूलभूत सेवासुविधा पुरवाव्यात, अशी मागणी भाजप नेते दशरथ भगत यांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे.

वाशी रेल्वे स्टेशनच्या पूर्वेस असलेल्या सानपाडा–सोनखार परिसरातील नागरिकांना रेल्वेतिकीट घर, वाहनांसाठी पार्किंग, ऑटो स्टँड, पदपथ, पोलीस बिट चौकी, सुसज्ज सार्वजनिक शौचालयासह स्नानगृह, वाशी रेल्वेस्थानक ते सानपाडा सेक्टर १पर्यंत सीसीटीव्ही कॅमेरा बसवावेत. सानपाडा रेल्वे स्टेशनखालून भुयारी मार्गऐवजी नवीन मार्ग करावा आदी मागण्यांसाठी नगरसेवक म्हणून आपण स्वतः व त्यानंतर नगरसेविका वैजयंती भगत आणि रुपाली भगत यांच्यामार्फत सिडको प्रशासनाकडे मागील आठ वर्षांपासून पाठपुरावा करूनही प्रशासन लक्ष देत नाही.

सानपाडा सोनखरमध्ये नागरिकांच्या सेवेसाठी सार्वजनिक उद्यान, क्रिकेट, फुटबॉल अशा खेळाचे मैदान, विरंगुळा केंद्र, समाज मंदिर, व्यायामशाळा, सार्वजनिक ग्रंथालय व अभ्यासिका आदींसाठी जागा राखून ठेवावी यासाठी आम्ही सातत्याने आग्रही आहोत. याबाबत काही विकास कामे मंजूर झाली असून त्याची अंमलबजावणी करण्यास सिडको प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी दशरथ भगत यांनी केली आहे.

## महापरिनिर्वाण दिनी अभिवादन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आरपीआय आठवले गट नेरूळ विभाग, धम्मदीप सामाजिक संस्था बेलापूर आयकर कॉलनी यांच्या पुढाकाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण पूर्वसंध्येला आंबेडकर अनुयायांनी भव्य कँडल मार्च काढून महामानवास अभिवादन केले.



कपिलवास्तू बुद्धविहार येथे नेरूळमधील डॉ. आंबेडकर अनुयायी एकत्र जमून बाबासाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून सामुहिक अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रात्री काढण्यात आलेल्या भव्य कँडल मार्चमध्ये नेरुळमधील विविध बौद्ध धार्मिक संस्था, सामाजिक मंडळातील भीम अनुयायी सामील होत मार्चची सांगता नेरुळ सेक्टर ३मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात महापुरुषास अभिवादन करून करण्यात आली. या वेळी आरपीआय नेरुळ विभाग प्रमुख संतोष काळे, वॉर्ड अध्यक्ष रविंद्र खरात, संजय पाठारे आदी उपस्थित होते.

आयकर कॉलनी येथे भाजप युवा नेते सुभाष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्रीधर गोर, सहाय्यक निरीक्षक शिवाजी ढवळे, लोखंडे, चेतन अहिरे, पंजाबराव हारले, डी. के. पवार, अरुण गायकवाड, अभिजित सोनावणे, आत्माराम मागाडे, सत्यवान जाधव, समाधान गवई, किरण यादव आदी उपस्थित होते.

## नामांकित चित्रकारांचा मुंबईत कलाविष्कार



**उरण : वार्ताहर**

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे येथील नामवंत अशा १५ चित्रकारांनी एकत्रितपणे सादर केलेल्या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रकृतीचा अनोखा कलाविष्कार कलार्पण या शीर्षकांतर्गत मुंबईतील वरळी येथील प्रसिद्ध नेहरू सेंटर आर्ट गॅलरीत ६ ते १२ डिसेंबर या कालावधीत रोज ११ ते ७ या वेळेत पहायला मिळणार आहे. उरण तालुक्यातील चिरनेरचे अजय मोकल यांच्यासह इतर कलाकारांचा या प्रदर्शनात सहभाग आहे.

या सामुहिक कलाप्रदर्शनाचे आयोजन चित्रकार जितेंद्र गायकवाड यांनी केले असून या प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी (दि. ६) उद्योगपती विलास गुप्ते यांच्या हस्ते झाले. या वेळी कला क्षेत्रातील अनेक जाणकार मान्यवर मंडळी उपस्थित होती. कलार्पण या भव्य कलाप्रदर्शनात जितेंद्र गायकवाड, पुरेंद्र देवगिरीकर, शोभा भावसार, नितेश जाधव, पार्थ पाटील, अजिंक्य भगत, अनिकेत खाडे, अनिल चौधरी, सुनील देशमुख, स्वराज वांद्रे, प्रतीक भोसले, ओंकार पिलोळकर, मुक्ता कुलकर्णी, विठ्ठल पाटील या १५ चित्रकारांचा समावेश असून, त्यांनी सादर केलेला हा सौंदर्यपूर्ण, बोलका व कलात्मक नमुन्याचा अविष्कार सर्वांना आवडेल असाच आहे.

यात प्रामुख्याने जलरंग, तैलरंग वापरून साकारलेल्या वास्तववादी व अमूर्त शैलीतील विविध चित्रकृतीचा अनोखा कलाविष्कार रसिकांना पाहिला मिळणार आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी युवक जेरबंद

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यात २८ नोव्हेंबर रोजी साळविंदे येथील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या एका युवकाला म्हसळा पोलिसांनी जेरबंद केले आहे.

इ. ९ वीत शिकणारी १५ वर्षांची अल्पवयीन मुलगी आगरवाडा येथील शाळेत गेली असता, तिचे वरवठणे गावातील मुलाने अपहरण केले. या गंभीर घटनेची माहिती मुलीच्या घरी समजताच मुलीच्या आईने म्हसळा पोलीस ठाण्यात फिर्याद केली. पोलिसांनी या युवकावर ३० नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करून तातडीने तपास सुरू केला. अखेर पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले असून संघर्षविधीग्रस्त बालकाला बालसुधारगृहांत पाठविले आहे. मुलीला पळविण्यासाठी वापरण्यात आलेली कारही जप्त केली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नवी मुंबई महापालिकेत अभिवादन




**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज गरड, शहर अभियंता संजय देसाई, उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, डॉ. श्रीराम पवार, सोमनाथ पोटरे, योगेश कडुसकर, मंगला माळवे, सहाय्यक संचालक नगररचना सोमनाथ केकाण, अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे, मदन वाघचौडे, सुनील लाड, संजय भय्यासाहेब पाटील, संजय दादा पाटील, विजय राऊत, सोनावणे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## मुंबईचा कायापालट होणार

महानगरात ज्या ठिकाणी स्वच्छतागृहांची उभारणी सुरू आहे, त्या कामांना गती द्यावी. त्याचबरोबर पूर्व द्रुतगती मार्ग आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावर अद्ययावत स्वच्छतागृहांची उभारणी तातडीने करावी. शहरातील स्कायवॉकवर रोषणाई करावी. त्याचबरोबर स्कायवॉकवर महाराष्ट्र सुरक्षा महामंडळाकडून सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी, असेही एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईतील रस्ते, समुद्रकिनारे, शौचालये यांची निरंतर स्वच्छता झाली पाहिजे. त्यासाठी महापालिकेने आवश्यक त्या यंत्रसामुग्री शहराच्या स्वच्छतेच्या गरजा ओळखून घ्याव्यात. स्वच्छतेच्याबाबतीत जगातल्या ज्या सर्वोत्तम संकल्पना आहेत, त्या मुंबईत राबवाव्यात, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले. झोपडपट्टी भागात कम्युनिटी वॉशिंग मशिन ही संकल्पना अमलात आणावी. मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल यांनी मुंबई सौंदर्यीकरणाचे सादरीकरण केले. मुंबईतील रस्त्यांच्या वरच्या थरांचे नूतनीकरण (रिसर्फेसिंग), पदपथ, रस्ते, पूल, वाहतूक बेटे, वॉलपेंटींग, उद्याने आणि कोळीवाडे यांच्या सुशोभिकरणाची माहिती देण्यात आली.

## पनवेलमध्ये अबोली रिक्षा दिमाखात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये सध्या अबोली रिक्षाचालकांचा सर्वत्र दबदबा पहायला मिळत आहे. सामाजिक कार्यकर्ते संतोष भगत यांनी अबोली महिला रिक्षा संघटनेची स्थापना केली.

पनवेलच्या तत्कालीन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या पाठबळामुळे २०१८मध्ये ८ मार्च जागतिक महिला दिनी नवीन पनवेल डी–मार्ट येथे पहिला अबोली रिक्षा थांबा सुरू करण्यात आला. आजच्या घडीला पनवेलच्या रस्त्यावर १३० अबोली रिक्षा दिमाखाने धावत आहेत. सद्य स्थितीत पनवेलमध्ये चार ठिकाणी अबोली रिक्षा थांबे आहेत.

### चार ठिकाणी थांबे

सुरळीत प्रवासी वाहतूक, प्रामाणिकपणाच्या जोरावर अबोली रिक्षाचालक महिलांनी समाजापुढे आदर्श ठेवला आहे. दिवसभर सुरळीत प्रवासी वाहतूक करून महिलांनी धाडसी प्रवृत्तीने घर–प्रपंचाची जबाबदारी यशस्वीरीत्या उचलली आहे. त्यामुळे स्त्री–शक्ती सक्षमीकरणासोबत अबोली समाजातील एक महत्त्वाचा घटक बनली आहे.

२०१६मध्ये ठाणे येथे एका पुरुष रिक्षाचालकाने रिक्षामध्ये बसलेल्या एका मुलीशी अश्लिल हावभाव केल्यामुळे त्या मुलीने रिक्षातून उडी टाकली. त्यामुळे मुलगी गंभीर जखमी होऊन कोमामध्ये गेली होती. या घटनेचे तीव्र पडसाद ठाणे परिसरात उमटल्यानंतर विचारमंथनातून महिलांच्या सुरक्षतेसाठी अबोली रिक्षेची संकल्पना अस्तित्वात आली. गठीत समितीने महिला रिक्षाचालकांसाठी गुलाबीऐवजी अबोली रंगाची रिक्षा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. या काळात ठाणे परिसरात पहिली अबोली रिक्षा रस्त्यावर धावली. परिवहन विभागाने रिक्षा परमीट सोडवताना अबोलीसाठी पाच टक्के आरक्षण जाहीर केले होते.

**अबोली रिक्षामुळे अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली पाहिजे. ठाणे, नवी मुंबई, पनवेल परिसरात अनेक अबोली रिक्षा धावत आहेत. परमिट देण्याचे निकष बदलले आहेत. त्यामुळे अबोलीसाठी नव्याने परमीट मिळवताना अडचणी येत आहेत. त्यामुळे महिलांनी नाराज होऊ नये, नियमित रिक्षांसाठी प्रयत्न केले पाहिजे.**

**–हेमांगिनी पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी**

**नवीन पनवेलमध्ये पाच महिलांनी धाडसाने अबोली रिक्षा चालवण्याचा शुभारंभ केला. आज अनेक महिला रिक्षा चालवण्यासाठी उत्सुक आहेत. प्रवासी महिला आमच्या कामाचे कौतुक करतात, याचा अभिमान वाटत आहे.**

**–ललिता राऊत, अबोली चालक**

**अबोलीमुळे हाताला काम मिळाले आहे. त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडत आहे. सरकारने अबोलीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी अजून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.**

**–जयश्री देशमुख, अबोली चालक**

## पनवेलच्या लिमये वाचनालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय येथे भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त माजी प्राचार्य चंद्रकांत नवगिरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

सर्वप्रथम संस्थेच्या अध्यक्ष्या ॲड. सुनिता जोशी यांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते चंद्रकांत नवगिरे यांनी त्यांचा थोडक्यात परिचय करून देऊन कार्यक्रमाची सूत्रे संकल्प आ. बांगरे यांच्याकडे सोपवली. त्यांनी भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी श्याम वालावलकर, जयश्री शेट्ये, रमेश चव्हाण, हिमालिनी कुलकर्णी, ग्रंथपाल निकेता शिंदे, लिपिक संपदा जोशी, सेवक संजय दिवटे व वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्याध्यक्ष विनायक वत्सराज यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### दुखवटा



## पुजारी गणपत गुरव

**कर्जत** : श्री कपालेश्वर देवस्थानचे पुजारी गणपत महादू गुरव (पवार) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. निधनासमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी, दोन पुतणे, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# पनवेल परिसरात अवैध धंद्यांना चाप

## शेतकऱ्याला मारहाण करणारा बिल्डर अटकेत


(छाया : चेतन गोपेटा)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बांधकामाचा करार ठरवून दिलेल्या वेळेत पूर्ण न केल्याने फ्लॅटच्या ताब्याबाबत विचारण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला जबरदस्तीने गाडीत टाकून ऑफिसला नेऊन हॉकी स्टिक व फावड्याच्या दांड्याने मारहाण करणाऱ्या बिल्डरला पोलिसांनी सोमवारी (दि. ५) अटक केली.

मोठा खांदा येथील उद्देश टेंभे यांच्या सासरे काशीराम शंकर ठोकळ यांचा उलवे येथील सेक्टर १६, प्लॉट नं. ए ३५, क्षेत्र १५० चौ. मी. असणारा भूखंड मे. अमन डेव्हलपर्स मार्फत मालक मनोजकुमार सिंग यांना बांधकामास दिला होता. या व्यवहारात त्यांच्या पतकीच्या नावे असणाऱ्या व्यवहाराची पॉवर ऑफ ॲटोर्नी उद्देश टेंभे यांच्याकडे होती. या करारात बांधकाम ठरवून दिलेल्या वेळेत व अटीशर्तीप्रमाणे न केल्याने याबाबत मनोज सिंग यांना वारंवार विचारणा केली मात्र त्यांना सिंग यांनी उत्तर दिले नाही. त्यामुळे टेंभे यांनी सिंग यांच्याविरोधात रेरामध्ये तक्रार दाखल केली. त्याचा राग मनात धरून बिल्डरने टेंभे कुटुंबीयांना त्रास देण्याचा प्रयत्न सुरू केला. जानेवारीमध्ये उद्देश टेंभे बांधकामाच्या ठिकाणी पाहणीसाठी गेले असता मनोज सिंग यांच्या सात ते आठ बॉडिगार्ड्सने त्यांना हॉकी स्टिक, फावड्याचा दांडा व लाथा बुक्क्याने बेदम मारहाण केली तसेच जबरदस्तीने ऑफिसला नेऊन मनोज सिंग व त्याच्या बॉडिगार्ड्सने पुन्हा मारहाण केली.

या संदर्भात न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात मनोज सिंग यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता, मात्र पोलीस कारवाईच्या भीतीने मनोज सिंग फरार झाला होता. अखेर सोमवारी त्याला पोलिसांनी अटक केली. मनोज सिंग याला मंगळवारी पनवेल कोर्टात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मनोज सिंग याने अमन डेव्हलपर्सच्या माध्यमातून अश्या प्रकारे अनेक जणांना लाखोंचा गंडा घातल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे. त्यामुळे आरोपीवर कठोर कारवाईची व्हावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

## खारघरमध्ये ई-सिगरेट विक्रीप्रकरणी दोघांवर कारवाई; मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

गुटखा सुंगधित सुपारी प्रमाणेच ई-सिगारेटलाही राज्यात बंदी आहे. बंदी असतानाही ई-सिगारेटचे व्यसन असणाऱ्यांची संख्या वाढत आहे. अशांवर पोलिसांची वक्रदृष्टी पडली असून खारघर येथे केलेल्या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्या कडून वेगवेगळ्या फ्लेवरच्या एक लाख ६४ हजार २०० रुपयांच्या ई-सिगारेट जप्त करण्यात आल्या आहेत.



राजेशकुमार मानिकचंद साहू (वय ३२) आणि मोहहमद अर्शद सलीम शेख (वय ३३) असे यातील आरोपींची नावे आहेत. दोन व्यक्ती विदेशी कंपनीच्या ई-सिगारेट विक्री करण्यास येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली पथक नेमण्यात आले. मिळालेल्या माहितीच्या आधारे भूमी टॉवर नजीक खारघर सेक्टर ४ येथे सापळा लावण्यात आला होता. त्यात दोन्ही आरोपी अडकले. त्यांची अंगझडती घेतली असता राजकुमारकडे वेगवेगळ्या कंपनींचे विविध फ्लेवरच्या ६३ ई-सिगारेट आढळून आल्या. ज्याची किंमत ६३ हजार रुपये आहे.

मोहम्मदकडे वेगवेगळ्या कंपनीच्या सिगारेटचे २९ हजार १०० रुपयांचे ९७ सिगारेट पाकिटे आढळून आली. एकूण एक लाख ६४ हजार २०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर सय्यद यांनी दिली.



## नितळस ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश

### तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नितळसमधील शिवसनेच्या (ठाकरे गट) ग्रामस्थांनी भाजपचे प्रकाश खैरे व राम पाटील यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. या मध्ये ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सदस्याचाही समावेश आहे. भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत केले.

पनवेलमधील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, प्रकाश खैरे, राम पाटील, कैलास मढवी, मारूती पावशे, भार्गव सांगडे, सागर सांगडे, धर्मा पावशे, शरद पावशे, रूपेश पावशे, शिवा दरे, विकास पावशे, दिनेश पावशे, दर्शन म्हात्रे, आमृता मनवी, चित्रा सांगडे, निशा पावशे, पुजा पावशे, दर्शना पावशे आदी उपस्थित होते.

नितळस ग्रामपंचायतीमध्ये बिनविरोध निवडून आलेल्या सदस्य सुमिता काठे यांच्यासह बाळु काठे, महादू काठे, बालाजी काठे, पांडुरंग काठे, जगदिश काठे, रवी काठे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

## महात्मा फुले महाविद्यालयात दोन दिवस विविध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये पद्मविभूषण खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ९ व १० डिसेंबर रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व, निबंध व महिला कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही कार्यक्रमांना विशेष उपस्थिती माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांची असेल.

वक्तृत्व व निबंध स्पर्धा शुक्रवारी (दि. ९) महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात सकाळी १० वाजता घेण्यात येणार आहेत. उद्घाटन प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५००० रुपये व सन्मान चिन्ह, द्वितीय पारितोषिक ३००० रुपये व सन्मानचिन्ह तर तृतीय पारितोषिक २००० रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. शनिवारी (दि. १०) महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर राज्यस्तरीय महिला कबड्डी स्पर्धा घेण्यात येणार असून स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते (कबड्डी) सुर्यकांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक १०,००० रुपये व सन्मान चिन्ह द्वितीय पारितोषिक ५००० रुपये व सन्मानचिन्ह तर तृतीय पारितोषिक ३००० रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयीन विद्यार्थी व महिला कबड्डी संघ यांनी सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी केले आहे.

## अवजड आणि घातक रसायनांच्या टँकरवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

रोडपाली परिसरात अवजड आणि घातक रसायनांचे टँकर उभे केले जातात. रहिवाशांनी याबाबत वारंवार पोलीस विभागाकडे तक्रारी केल्या आहेत, मात्र पोलिसांचे कारवाईत सातत्य नसल्याने हा प्रश्न सुटलेला नाही. पनवेल व उरण परिक्षेत्रासाठी नव्याने नियुक्त झालेल्या नवी मुंबईच्या पोलीस उपायुक्तांनी मात्र रहिवाशांचा हा सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी पाऊल उचल्याचे चित्र आहे. वसाहतीमध्ये बंदी असतानाही अवजड वाहने उभी केल्याने आतापर्यंत आठ टँकरवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. भारतीय दंड संहिता २८३ प्रमाणे ही कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी दिले आहेत.

रोडपाली परिसरात रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात अवजड वाहने उभी करून चालक तेथेच त्यांचा संसार थाटतात. त्याच वाहनाशेजारी जेवण शिजवणे, अंघोळी करणे यामुळे या परिसरातील नागरिक त्रासले आहेत. सिडको मंडळाने या परिसरात अवजड वाहने येऊ नयेत यासाठी हाइट गेट उभारले, मात्र तेही अवजड वाहनांच्या ठोकरीने मोडून ठेवले. पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी रहिवाशांच्या तक्रार अर्जांवर ही कारवाई करण्यास प्राधान्य दिल्याचे बोलले जात आहे. उपायुक्तांच्या या कारवाईमुळे अनेक महिन्यांपासून अवजड वाहनांच्या पार्किंगमुळे झाकलेले रस्ते मोकळे होऊन रस्ते रुंद झाल्याचे दिसत आहे.

पोलीस उपायुक्त डहाणे यांनी अवजड वाहनांनी लोकवस्तीमध्ये घुसखोरी केल्यास कारवाई करण्याचे आदेश दिल्याप्रमाणे पदपथावर रहदारीस अडचण करून घरगुती गॅस सिलेंडरच्या साह्याने व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. त्याअनुषंगाने ज्वालाग्राही वस्तूमुळे इतरांच्या जिवाला धोका असल्याने पोलीस ही कारवाई करत आहेत.

## निवडक

### महागड्या सायकलीसह चप्पलची चोरी

**पनवेल :** महागड्या सायकलीसह चपलची चोरी झाल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे. खारघर वसाहतीमधील सेक्टर १८ या ठिकाणी असलेल्या इनपुट पॅराडाईस, रजेत ज्योत सह सेक्टर ३४ येथील मिऱ्याकर सोसयटी त्याचप्रमाणे सेक्टर ३५ येथूनसुद्धा महागड्या सायकली त्याचप्रमाणे महागडे बूट व चप्पल यांची चोरी भुरटे चोर करीत आहेत. याबाबतच्या तक्रारी खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत. अश्या चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी रहिवाशी करत आहे.

### काशिनाथ जाधव विश्वस्तपदी



**पनवेल :** जनजागृती ग्राहक मंच पनवेल शाखेचे अध्यक्ष, पनवेल तालुका निवृत्ती सेवक मंडळाचे कोषाध्यक्ष व के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल या संस्थेचे कार्यवाह शिव व्याख्याते काशिनाथ लक्ष्मण जाधव यांची नुकतीच श्री नाईक मराठा मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विश्वस्तपदी बिनविरोध निवड करणेत आली आहे. याबद्दल काशिनाथ जाधव यांचे अभिनंदन होत आहे.



## खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वाचन सप्ताह

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात दिनांक सहा रोजी महापरिनिर्वाणदिन साजरा करण्यात आला. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयांमध्ये ग्रंथालय समितीने साप्ताहिक वाचनाचे आयोजन केले.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये वेगवेगळ्या विषयांचे ग्रंथ ठेवण्यात आले. या वेळी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी तसेच प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ग्रंथ वाचण्याचा आस्वाद घेतला व सहकार्य केले. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल समितीचे समन्वयक प्रा. धनवी आवटे यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. शुभांगी वास्के, प्रा. डॉ. अविनाश जुमारे, प्रा. प्रेरणा सातव, प्रा. तनुजा सुमन, ग्रंथपाल वैभव झगडे या सर्वांनी सहकार्य केले.

## उरण महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन



**उरण : वार्ताहर**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड, प्रा. के. ए. शामा, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ए. के. गायकवाड यांनी केले. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य व कर्तुत्वावर प्रकाश टाकण्यात आला.

## स्व. ताराबाई केसरीनाथ म्हात्रे यांच्या अवयवदानाने अनेकांना जीवदान

**पनवेल : वार्ताहर**



स्व. ताराबाई केसरीनाथ म्हात्रे यांनी मृत्यूनंतरही अनेकांना अवयवदानातून जीवनदान दिल्याने दुखातही कोणाला तरी जीवनदान मिळाल्याचा समाधान कुटुंबीयांना मिळत आहे.

ताराबाई यांचे १० अवयव दान केल्याने १० जणांचे जीव वाचणार आहेत. स्व. ताराबाई म्हात्रे (वय ५९, रा. बामणडोंगरी, उलवे नोड, ता. पनवेल) यांचे मंगळवारी (दि. ६) निधन झाले. ताराबाई यांच्या निधनामुळे म्हात्रे परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. स्व. ताराबाई म्हात्रे या खुप मनमिळावु व प्रेमळ स्वभावाच्या होत्या. स्व. ताराबाई म्हात्रे घरात पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागून जखमी झाल्या होत्या, त्यानंतर त्यांना उलवे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु ताराबाई यांची प्रकृती खालावली असल्यामुळे त्यांना उपचारासाठी सानपाडा येथील एमपीसीटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. हॉस्पिटलमध्ये ताराबाई यांची प्रकृती खालावून त्यांचा मेंदू मृत झाल्याचे डॉक्टरांनी कुटुंबियांना सांगितले. त्यांनतर कुटुंबीयांनी ताराबाई यांना एमजीएम हॉस्पिटल वाशी येथे हलवून स्व. ताराबाई यांचे पती केसरीनाथ चावजी म्हात्रे, मुलगा वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, मुलगा संदीप म्हात्रे मुलगी सेजल मढवी यांनी ताराबाई यांचे अवयवदान करण्याचा धाडशी आणि चांगला निर्णय घेऊन मृत्यूनंतरही अनेकांचे जीव वाचवण्याचा आदर्श समाजापुढे ठेवला. त्यामुळे अशा धाडसी निर्णयाचे स्व. ताराबाई यांच्या कुटुंबाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

स्व. ताराबाई यांच्या पश्चात त्यांचे पती केसरीनाथ चावजी म्हात्रे, त्यांचा मुलगा वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर केसरीनाथ म्हात्रे व दुसरा मुलगा संदीप केसरीनाथ म्हात्रे, तसेच मुलगी सेजल तुषार मढवी नातू आयुष, नात अनिष्का, श्रीशा असा परिवार आहे. स्व. ताराबाई म्हात्रे या सा. 'अभेद्य प्रहार'चे संपादक प्रकाश जनार्दन म्हात्रे यांची मोठी बहिण होत्या.











पनवेल : श्री दत्त जयंतीनिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यातील दुंदरे, रिटघर, वावजे, शिवकर, वाजे, अरिवली या ठिकाणीच्या दत्त मंदिरामध्ये दर्शन घेतले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील उपस्थित होते.

## संपादकीय

# शक्तिवर्धकाच्या शोधात...

ज्या महाविकास आघाडीसोबत जाण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसला, ती महाविकास आघाडी आज 'आहे आणि नाही' अशा अवस्थेत तग धरून आहे. मुळात ही आघाडी केवळ सत्तेपुरती होती हे उघड आहे. सत्ता गेल्यानंतर ही आघाडी निरर्थक ठरल्यात जमा आहे. म्हणूनच उद्धव ठाकरे यांनी नवी राजकीय समीकरणे जुळवण्यासाठी धावाधाव सुरू केलेली दिसते.

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन नुकताच पार पडला. दादर येथील चैत्यभूमीवर बाबासाहेबांच्या स्मृतीस्थळाला वंदन करण्यासाठी 'शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे' पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आवर्जून उपस्थित होते. मुख्यमंत्रीपदी असताना शिष्टाचारापुरते ते चैत्यभूमीवर एक-दोनदा येऊन गेले असतील, परंतु त्याआधी या परिसरात त्यांना कुणी पाहिल्याचे आठवत नाही. सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांची व्यक्तिश: धावाधाव सुरू आहे आणि ती धावाधाव सारा महाराष्ट्र शांतपणे पाहात आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेना या पक्षाची दोन शकले झाली, त्यापैकी एक मोठा भाग आजही राज्याचा कारभार पाहतो आहे आणि उरलीसुरली शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आपल्या अस्तित्वाची लढाई लढते आहे. मध्यंतरी ठाकरे यांनी संभाजी ब्रिगेडचा हात हाती धरला. ज्या संघटनेवर अमर्याद टीका केली, ती संघटना आता ठाकरे यांच्या पक्षाला हवीहवीशी वाटू लागली यात कसलेही गूढ नाही. हे निव्वळ मतांच्या राजकारणापायी घडते. उद्धव ठाकरे यांनी गेल्या आठवड्यात वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्यासमोर लाल गुलाबाचे फूल धरले. त्यातही आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. शिवसैनिकांना काय वाटते याची पर्वा ठाकरे यांनी या आधीही कधी केली नव्हती, यापुढे देखील आपल्या सैनिकांना काय वाटते याचा विचार ते करणार नाहीत हे उघड आहे. ठाकरे गट आणि आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी यांच्यात आघाडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या दोघा नेत्यांमध्ये नुकतीच मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलात एक बैठकदेखील झाली. अर्थात ही बैठक बंद दाराआड झाल्यामुळे प्रकाश आंबेडकर यांनी सावधपणे पावले उचललेली बरी. कारण बंद दाराआड घडलेल्या किंवा न घडलेल्या गोष्टींचे राजकारण करण्याची काही लोकांना सवयच जडलेली असते. वंचित आणि ठाकरे गटामध्ये नजीकच्या भविष्यकाळात आघाडी झाली तरी त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर फारसा काही परिणाम होणार नाही. या दोन्ही पक्षांची आघाडी झाली हे गृहित धरले तरी वंचितचे कार्यकर्ते हिंदुत्ववादी शिवसेनेला मतदान करणार का, हिंदुत्वाचा वारंवार उद्घोष करणाऱ्या शिवसेनेचे कार्यकर्ते वंचितच्या कार्यकर्त्यांशी खांद्याला खांदा भिडवून निवडणुकीत काम करणार का असे जटिल प्रश्न आधी सोडवावे लागतील. वंचित बहुजन आघाडी काय किंवा उद्धव ठाकरे यांची शिवसेना काय, या दोन्ही पक्षांचे स्वभाव आणि कार्यपद्धती यामध्ये जमीन-अस्मानाचे अंतर आहे. निव्वळ मतांच्या राजकारणासाठी एकत्र यायचे म्हटले तरी ते सहजासहजी यशस्वी होणारे नाही आणि यशस्वी झाले तरी त्याचा भाजपवर काही परिणाम होण्यासारखा नाही. प्रकाश आंबेडकर म्हणजेच एकगठ्ठा दलित मते असे मानण्याचे काहीच कारण नाही. शक्तिवर्धकाच्या शोधात असलेले तोळामासा प्रकृतीचे दोन पक्ष एकत्र येण्याने काहीही साध्य होणार नाही.**

# स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०२२-२३ मध्ये राबविण्यास ४ ऑक्टोबर २०२२च्या शासन निर्णयानुसार पुन्हा मान्यता देण्यात आली आहे. काय आहे ही योजना जाणू घेऊया लेखातून...

योजनेचे मुख्य उद्दिष्ट-पिक व पशुधन याबरोबर फळबागेच्या रुपाने शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादनाचा स्त्रोत उपलब्ध करून देणे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत लागवडीचा लाभ देण्यास अपात्र असणाऱ्या शेतकऱ्यास लाभ देण्यासाठी. लागवडीसाठी अनुज्ञेय फळपिके : कलमे-आंबा, काजू, पेरु, सीताफळ, आवळा, चिंच, जांभूळ, कोकम, फणस, चिकू, कागदी लिंबू. रोपे- नारळ बाणावली, टि/डी. क्षेत्र मर्यादा- कोकणाकरिता कमाल १० हेक्टर उर्वरित महाराष्ट्र ६ हेक्टर (रोजगार हमी योजना/महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत यापूर्वी लाभ घेतलेल्या क्षेत्रासह) लाभार्थी निकष- वैयक्तिक शेतकरी, ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) अंतर्गत लागवडीचा लाभ देण्यास अपात्र असणाऱ्या शेतकऱ्यास लाभ देणे, स्वतःच्या नावे ७/१२ व संयुक्त खातेदार असल्यास संमतीपत्र आवश्यक, कुळाच्या नावे असल्यास कुळाचे संमतीपत्र आवश्यक, परंपरागत वन निवासी अधिनियम २००६ नुसार वनपट्टेधारक शेतकरी, किमान १० गुंठे जमीन आवश्यक, अल्प/अत्यल्प, महिला, दिव्यांग शेतकरी यांना प्राधान्य.



यामध्ये शेतकऱ्याने स्वखर्चाने-जमीन तयार करणे, शासन अनुदानित-खड्डे खोदणे, शेतकऱ्याने स्वखर्चाने-माती व शेणखत/सेंद्रिय खत मिश्रणाने खड्डे भरणे, शासन अनुदानित-कलमे लागवड करणे (नारळाच्या बाबतीत रोपे), शेतकऱ्याने स्वखर्चाने- रासायनिक खत वापरुन खड्डे भरणे, शासन अनुदानित-पीक संरक्षण, शेतकऱ्याने स्वखर्चाने- आंतर मशागत करणे, शासन अनुदानित-नांग्या भरणे, शेतकऱ्याने स्वखर्चाने- काटेरी झाडांचे कुंपण (ऐच्छिक), शासन अनुदानित- ठिंबक सिंचनाद्वारे पाणी देणे, या बाबी समाविष्ट आहेत.

ठिबक सिंचन संच उभारणीकरिता १०० टक्के अनुदान. केंद्र पुरस्कृत ठिबक सिंचन योजनेतून अनुज्ञेय असणारे अनुदान प्रथमतः अदा करून उर्वरीत अनुदान या योजनेतून देय.

अंतर्गत अर्थसहाय्य-अनुदानाचे वाटप ५०:३०:२० याप्रमाणे तीन वर्षांत फळांच्या जिवंत टक्केवारीनुसार देय. प्रथम वर्ष ८० टक्के, दुसरे वर्ष ९० टक्के झाडे जिवंत असावीत. आवश्यक कलमे/रोपे शासकीय/ कृषी विद्यापीठाच्या रोपवाटिकेतून परमिट व्दारे घेतल्यास कलमा/ रोपाचे अनुदान थेट रोपवाटिकास बँकेव्दारे वर्ग करावे. उर्वरीत अनुदान शेतकऱ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग करावे.

**अर्ज करावयाची कार्यपध्दती :** स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन शेतकऱ्यांचे अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून पुढील २१ दिवसांच्या आत अर्ज स्विकारण्यात यावेत. जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास सोडत पद्धतीने निवड करण्यात यावी व निवड केलेल्या लागवडीबाबत त्वरित पूर्वसंमती देण्यात यावी.

स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या लाभासाठी http://mahadbt.gov.in या संकेतस्थळावरून शेतकरी योजना पर्याय निवडून ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील तसेच ठिबक सिंचनाच्या लाभासाठी त्याच संकेतस्थळावर वेगळा अर्ज करावा.

**सादर करावयाची कागदपत्रे :** विहीत नमुन्यातील अर्ज, ७/१२ व ८ अ उतारा, करार पत्रक प्रपत्र/हमीपत्र, संयुक्त खातेदार असल्यास सर्व खातेदारांचे संमतीपत्र परिशिष्ट-१, आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत (फोटोसहीत), आधार कार्ड छायांकित प्रत,जातीचा दाखला (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांसाठी). कलमे रोपांची निवड लाभार्थीने स्वतः करावयाची आहे. त्यासाठी कलमे/रोपे खरेदी करताना रोपवाटिकांचा प्राधान्यक्रम असा राहील-कृषी विभागाच्या रोपवाटिका, कृषी विद्यापिठांच्या रोपवाटिका, राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित पंजीकृत खाजगी रोपवाटिका, परवानाधारक खाजगी रोपवाटिका.

**योजनेंतर्गत इतर तरतुदी :-**

* फळबाग लागवडीचा कालावधी माहे जून ते मार्च अखेरपर्यंत राहील.

* कोकण विभागास १० हेक्टर क्षेत्रापर्यंत लागवड करण्यास मान्यता असून ठिंबक सिंचन या घटकास १०० टक्के अनुदान देय करण्यात आले आहे. त्यामुळे ५ हेक्टर क्षेत्रापर्यंतच्या लाभार्थीस प्रथमतः प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून अनुज्ञेय

* अनुदान देय करण्यात यावे व उर्वरीत अनुदान भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून देण्यास मान्यता.

* महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) अंतर्गत सन २०१० पासून पुढे लागवड केलेल्या फळबाग लागवडीचे क्षेत्र वगळून लाभार्थ्यास उर्वरीत अनुज्ञेय क्षेत्रापर्यंत (एकूण १० हे.) या योजनेमध्ये लाभ देण्यास मान्यता.

* १ हेक्टर पेक्षा कमी व त्यापेक्षा जास्त क्षेत्राकरिता लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना प्रधान मंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत ०.४० ते

* ५ हेक्टर क्षेत्राकरिता ठिबक सिंचनाच्या मंजूर मापदंड प्रमाणे अनुदान देण्यास मान्यता.

* कोकण विभागातील ज्या शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचा वापर करणे शक्य आहे, अशा शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचा लाभ देण्यात यावा. तसेच ज्या शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संच बसविणे शक्य नाही. परंतु योजनेतील इतर घटकाचा लाभ घेवू इच्छितात,अशा शेतकऱ्यांना शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या झाडे जगवण्याच्या अटीवर अन्य घटकांचा लाभ देण्यास मान्यता.

* कोकण विभागातील ज्या शेतकऱ्यांनी फुंडकर फळबाग लागवड योजनेचा लाभ घेण्यापूर्वी त्याच सर्वे नंबर, गट नंबर करिता, ठिबक सिंचन योजनेचा लाभ घेतला असल्यास व ठिबक सिंचन संचाचे आयुष्यमान (४ वर्षांपर्यंत), शिल्लक असल्यास पुनःश्च ठिबक सिंचन संच बसविणे, हा घटक न राबविता इतर घटकांचा लाभ देण्यात यावा.

* लाभार्थ्याने लागवडीच्या पहिल्या वर्षी फळबाग लागवडीची नोंद ७/१२ उताऱ्यावर घेतली असल्यास पहिल्या वर्षी ५० टक्के अनुदान देण्यात यावे. तथापि दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीचे उर्वरीत ५० टक्के अनुदान हे ७/१२ उताऱ्यावर फळपिकाची नोंद घेतल्यानंतरच देण्यास मान्यता.

* रायगड जिल्ह्यासाठी या योजनेतून सामाजिक वर्गवारीनुसार सर्वसाधारण- रुपये २०२ कोटी २४ लाख, अनुसूचित जाती- रु.९ कोटी १९ लाख, अनुसूचित जमाती-रु. १ कोटी १ लाख, असे एकूण २१२ कोटी ४४ लाख इतका आर्थिक लक्षांक प्राप्त आहे. तरी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना फळबाग लागवड योजनेत लाभ न घेवू शकणाऱ्या व २ हेक्टर क्षेत्रापेक्षा अधिक फळबाग लागवड (कमाल १० हेक्टर) करु इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**



## बदलते तंत्रज्ञान



# आयफोनचे भन्नाट फीचर; वस्तूचे करा मोजमाप

आधुनिक तंत्रज्ञान आणि नवनवीन फीचर्समुळे ॲपलचे फोन ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहेत. अलिकडे ॲपलच्या एसओएस सॅटेलाइट कनेक्टिव्हिटी फीचरने अलास्कामधील बर्फाळ प्रदेशात अडकलेल्या व्यक्तीला संकटातून बाहेर काढल्याचे समोर आले होते. यातून फोनमधील फीचर किती उपयुक्त ठरू शकतात हे दिसून येते. तुमच्याकडे आयफोन असेल तर त्यातील काही अनोखे फीचर्स तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. त्यातीलच एक आहे लाइट डिटेक्शन अँड रेजिंग फीचर. लाइट डिटेक्शन अँड रेजिंग स्कॅनरद्वारे तुम्ही कोणत्याही वस्तूचे मोजमाप करू शकता. काय आहे हे फीचर? जाणून घेऊया.

लाइट डिटेक्शन ॲण्ड रेजिंग स्कॅनर रिअर कॅमेऱ्याच्या बाजूला असतो. हे फीचर आयफोनच्या कॅमेऱ्याचा वापर करून उंची मोजते. लाइट डिटेक्शन ॲण्ड रेजिंग युजरला पर्यावरण स्कॅन आणि मॅप करण्याची परवानगी देते. फीचर रडारसारखेच काम करते आणि केवळ अंतर आणि खोली मोजण्यासाठी लेजर वापरते.

सर्व आयफोनमध्ये हे फीचर मिळत नसून ते केवळ आयफोन १२, १३ आणि १४ प्रोमध्ये उपलब्ध आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही कधीही आणि कुठेही उंची मोजू शकता. हे फीचर मीजर ॲपद्वारे काम करते. आयफोनवर तुम्ही हे फीचर कसे वापरू शकता? याबाबत जाणून घेऊया.

सर्वांत आधी आपल्या आयफोनवर मीजर ॲप उघडा. आयफोनची पोजिशन बरोबर करा, जेणेकरून तुम्ही ज्या व्यक्तीचे मोजमाप करू इच्छिता ती व्यक्ती स्क्रिनवर डोक्यापासून पायापर्यंत दृश्यमान होईल.

आता व्यक्तीच्या डोक्यावर एक रेष दिसून येईल ज्यात रेषेच्या खाली उंचीचे माप दिसून येईल. छायाचित्र घेण्यासाठी पिक्चर बटनवर क्लिक करा.

फोटो सेव्ह करण्यासाठी तळाशी डाव्या कोपर्यातील स्क्रिनशॉटवर टॅप करा.

यानंतर 'डन'वर टॅप करा आणि नंतर सेव्ह टू फाइल्स किंवा सेव्ह टू फोटोज निवडा.

# सार्क संघटनेचा आज स्थापना दिवस

## निमित्त

सार्क ही दक्षिण आशियाई देशांची विभागीय (प्रादेशिक) सहकार्यासाठी स्थापन झालेली एक संघटना. तिचे पूर्ण इंग्रजी नाव 'एशियन असोसिएशन फॉर रीजनल को-ऑपरेशन' असे असून त्यास मराठी पर्यायी नाव 'आशियाई विभागीय सहकार्य संघटना' असे आहे.

सार्कची स्थापना ८ डिसेंबर १९८५ मध्ये झाली व तिचे स्थायी कार्यालय (सचिवालय) काठमांडू (नेपाळ) येथे आहे. सरचिटणीस हा तिचा मुख्य अधिकारी असून सात संचालक (प्रत्येक देशाचा एक)त्यास मदत करतात. त्यांची नियुक्ती सरचिटणीस सभासदराष्ट्रांच्या शिफारशीनुसार तीन वर्षांकरिता करतो. अपवादात्मक परिस्थितीत कालमर्यादा वाढविण्यात येते. सचिवालयाची अधिकृत भाषा इंग्रजी आहे आणि संघटनेची भारत, बांगला देश, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भूतान व मालदीव ही राष्ट्रे कायम सभासद आहेत. या सात राष्ट्रांचे पंतप्रधान/राष्ट्रप्रमुख या संघटनेचे प्राधिकारी असून वर्षातून एक परिषद देशांच्या नावाच्या अकारविल्हेनुसार त्या त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते. तीत आगामी धोरणांचे सुसूत्रीकरण, प्रगतीचे पुनर्विलोकन आणि सहकार्यासाठी नवीन क्षेत्रांचा शोध व तत्संबंधीची आवश्यक ती यंत्रणा यांविषयी विचारविनिमय होतो. या परराष्ट्र मंत्र्यांना परराष्ट्र सचिवांची स्थायी समिती सहकार्य करते, तसेच कार्यक्रमण करणारी समिती आणि ११ तांत्रिक समित्या देशपरत्वे विविध कार्यक्रमांच्या कार्यवाहीत सहभागी होतात.

या परिषदेच्या स्थापनेपूर्वी परराष्ट्र सचिवांच्या बैठकीत प्रथम या संघटनेच्या संदर्भातील एक मसुदा तयार करण्यात आला, त्यात संघटनेची पुढील उद्दिष्टे व धोरणे स्पष्ट करण्यात आली. दक्षिण आशियातील जनतेच्या कल्याणाला सर्वतोपरी प्राधान्य देणे. कृषी, वनविद्या, आरोग्य, लोकसंख्या, विज्ञान व तंत्रविद्या, हवामानशास्त्र,पर्यावरण, ग्रामीण विकास, स्त्रियांचा विकास, कला, शिक्षण वगैरेअकरा विभागांत (क्षेत्रांत) प्रादेशिक सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली असून त्यांच्या संवर्धन-संरक्षण यांवर भर दिला आहे. मादक पदार्थांचा व्यापार व दहशतवाद यांना पायबंद घालण्याच्या उपायांचा पाठपुरावाहीत्यात व्यक्त केला आहे. आर्थिक विकासवाढीस गती देणे, सभासदराष्ट्रात सामूहिक आत्मनिर्भरता जागृत करणे याही गोष्टी नमूद केल्याआहेत. प्रादेशिक सहकार्यासाठी सूत्रबद्ध नियोजन व एकमताच्या आधाराने सर्व निर्णय घेण्यात यावेत. चर्चेतून द्विपक्षीय आणि वादग्रस्तमुद्यांना वगळण्यात यावे, तसेच स्वायत्तता, समानता, प्रादेशिक एकात्मता,राजकीय स्वातंत्र्य कसे अबाधित राहील, यांवर कटाक्ष ठेवून परस्परांच्याअंतर्गत व्यवहारात संघटनेने हस्तक्षेप करू नये, या मुद्यांवर भर देण्यातआला आहे. मूळ मसुद्यात निर्दिष्ट केलेल्या अकरा विभागांपैकी कृषी,ग्रामीण विकास, दळणवळण, हवामान, आरोग्य व लोकसंख्या यांच्याअभ्यासासाठी स्वतंत्र गट नेमून प्रत्येक गटाचा एक स्वतंत्र संयोजक नेमावा, असे सूचित केले आहे.

सार्क या संघटनेच्या कल्पनेचा प्रथम उच्चार (पुरस्कार) बांगला देशाचे राष्ट्राध्यक्ष झिया ऊर रहमान यांनी केला. सार्कने मुक्त व्यापार ही कल्पना पूर्णतः स्वीकारली नाही. पाकिस्तान, नेपाळ, बांगला देश, मालदीव यांचा तिला विरोध आहे. संघटनेच्या काही देशांत लोकशाही आहे मात्र काही देशांत लोकशाही रुजलेली नसल्यामुळे सामूहिक निर्णयास काही मर्यादा पडतात. अद्यापि चीन व जपान यांनी निरीक्षक बनण्याची मनीषा विचाराधीन ठेवली आहे. नोव्हेंबर २०११ मध्ये भरलेल्या परिषदेत भारताने काही मौलिक सूचना केल्या. त्यांत भारत व पाकिस्तान यांत सौहार्दता निर्माण होण्यासाठी सांस्कृतिक देवाण-घेवाण, व्यापार करार यांवर भर देण्यात आला.

**-सु. र. देशपांडे**
**(साभार : मराठी विश्वकोष)**

## क्लिक...क्लिक...!



**नवी मुंबई : नूतन विद्यालय कर्णिक रोड भव्य पटांगणात शाळेचे कलाशिक्षक श्रीहरी पवळे आणि विद्यार्थ्यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त ५५५ पुस्तकांतून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कलाकृती साकारली होती. यासाठी तीन तास कालावधी लागला.**

## आरोग्य प्रहर

# जेवल्यानंतर छातीत होणारी जळजळ कमी करण्यासाठी टिप्स

जेवल्यानंतर छातीत जळजळ होण्याची समस्या अनेक लोकांना असते. या लोकांची पचनसंस्था खूप कमकुवत असते, त्यामुळे त्यांना काही खायच्या आधी खूप वेळ विचार करावा लागतो. शिवाय या लोकांनी काही तेलकट, मसालेदार पदार्थ खाल्ले तर त्यांना घशात आणि छातीत जळजळ होते शिवाय ढेकर येण्यास सुरुवात होते. अनेक वेळा आपल्या अवेळी आणि चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयींमुळे छातीत जळजळ होणे तसंच गॅसचा त्रास जाणवतो.



या समस्येला ॲसिड रिफ्लक्स असं म्हणतात, ज्यामध्ये खाल्ल्यानंतर पोटातील ॲसिड अन्ननलिकेमध्ये प्रवेश करते. त्यामुळे ही समस्या उद्भवते. ही एक समस्या सामान्य असली तरी यामुळे तुम्हाला अनेक प्रकारच्या अडचणींचा सामोरं जायला लागू शकतो. त्यामुळे पोटात जळजळ होण्याच्या समस्येपासून त्वरीत सुटका कशी करून घ्यायची याबाबतचे काही उपाय पुढीलप्रमाणे देण्यात आले आहेत.

साधारणता ॲसिड रिफ्लक्समध्ये खोकला आणि छातीत जळजळ होणे ही लक्षणे असतात. हा त्रास तुम्ही तुम्ही झोपता किंवा वाकता तेव्हा जास्त उद्भवतो. या त्रासापासून आराम मिळावा म्हणून बाजारात अनेक औषध उपलब्ध असून अनेकजण ती औषधं घेतात देखील. पण अनेक वेळेस तुमच्या चुकीच्या झोपण्याच्या पद्धतीमुळे हा त्रास जास्त जाणवतो.

**झोपण्याची योग्य पद्धत –** तुम्हाला या त्रासापासून सुटका करुन घ्यायची असेल तर तुम्हाला झोपण्याची योग्य पद्धत कोणती हे माहिती असायला हवं. त्यामुळे तुम्हाला जेव्हा छातीत जळजळ होत आहे असं वाटेल त्यावेळी डाव्या कुशीवर झोपा. अशा स्थितीत चुकुनही पाठीवर झोपू नका. कारण पाठीवर झोपलात तर ॲसिड रिफ्लक्स वाढू शकते.

**खाताना गडबड करू नका –** जळजळ होण्याचा त्रास जाणवायला लागल्यास तुम्ही ओट्स, ब्राऊन राईस, ब्रोकोली, रताळे, गाजर असे पदार्थ खा. ते खाल्ल्यास तुम्हाला बऱ्यापैकी या त्रासापासून आराम भेटेल. सर्वात महत्वाच म्हणजे तुम्ही जे काही खाणार आहात ते खाताना घाई गडबड अजिबात करू नका. प्रत्येक पदार्थ चांगला चावून खा. कोणताही पदार्थ खाता जास्त वेळ चावल्यास तो पचवण्यास मदत होते. त्यामुळे तुमच्या छातीत जळजळ होणार नाही.

**व्यायाम –** ॲसिड रिफ्लक्सपासून सुटका करण्यासाठी सर्वात महत्वाचा आणि उत्तम उपाय म्हणजे व्यायाम. नियमित व्यायाम केल्यास तुमची या त्रासापासून हमखास सुटका होईल.

# कर्जत शहरातील विकासकामांचे आमदार थोरवे यांच्या हस्ते लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील दहिवली परिसरात करण्यात आलेल्या सुमारे ३६ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले. नगरसेवक संकेत भासे यांच्या माध्यमातून या सर्व विकासकामांच्या निधीसाठी प्रयत्न करण्यात आले होते.

कर्जत नगर परिषद हद्दीतील दहिवली विभागात छत्रपती शिवाजी महाराज गार्डन, साईनगर गार्डन, संजय नगर येथील रस्ता, बस थांबा आणि अंतर्गत रस्ते अशी विविध विकासकामे करण्यात आली आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि नगरविकास विभागाच्या वैशिट्यपूर्ण योजनेअंतर्गत निधी मंजूर झाला होता. या सर्व विकासकामांचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते लोकार्पण झाले.



नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगर परिषदेचे बांधकाम सभापती राहुल डाळिंबकर, नगरसेविका सुवर्णा निलधे, विशाखा जिनघरे, मधुरा चंदन, नगरसेवक बळवंत घुमरे, मुख्याधिकारी वैभव गारवे, बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, ज्येष्ठ नेते संतोष भोईर, विधानसभा मतदारसंघ संपर्क प्रमुख पंकज पाटील, शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, युवासेनेचे शहर अधिकारी सचिन भोईर, शहर संपर्क प्रमुख अभिजित मुधोळकर, ऋषभ लाड, उपशहर प्रमुख दिनेश कडू, विभाग प्रमुख विशाल बैलमारे, स्थानिक नागरिक रमाकांत जाधव, दिलीप बोराडे, अजय सुवर्णे, डॉ. वैद्य , डॉ. म्हात्रे, सुरेश खानविलकर आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# कापडे बुद्रुक येथे अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील माध्यमिक विद्यालयामधील अल्पवयीन विद्यार्थिनीवर बलात्कार करून तिच्यावर मातृत्व लादल्याच्या घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमधील पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेला गुन्हा पोलादपूर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे. पोलादपूर पोलिसांनी एका आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला असून अद्याप त्याला अटक झाली नसल्याचे सांगण्यात आले.

कापडे बुद्रुक येथील श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयामध्ये दहावीच्या वर्गामध्ये शिकत असलेली १६ वर्षीय मुलगी अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही आरोपी अर्जून सकपाळ (पूर्ण नांव माहिती नाही, रा. भवानवाडी, कापडे बुद्रुक) याने तिच्यासोबत मैत्री करून वेगवेगळ्या ठिकाणी तिच्या इच्छेविरूध्द शारिरीक संबंध ठेवले. पीडित अल्पवयीन मुलीला गर्भपात करण्यासाठी मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असता डॉक्टरांनी थेट तेथील पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली.

दरम्यान, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडील पत्रान्वये या प्रकरणी रविवारी (दि. ४) रात्री पोलादपूर पोलीस ठाण्यात भादंवि ३७६(२)(एन)सह पोक्सोप्रमाणे ४,६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


।। अविश्रमो लोकतंत्राधिकारा ।।

**खोपोली नगरपरिषद**

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, फॅक्स : ०२१९२-२६४२११
E mail ID :- cokmckhopoli@gmail.com / daynulm1970@gmail.com
जा.क्र.के.एम.सी./CBT /२०२२-२३/३००८ दिनांक :- ७/१२/२०२२

**जाहीर प्रसिद्धीकरण**

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार DAYNULM अंतर्गत शहरातील बऱ्याच महिला अभियानाशी जोडल्या गेल्या आहेत. गटातील ज्या महिला तसेच गट हे अन्न व प्रक्रिया उद्योगाशी निगडीत आहेत अश्या गटांना क्रेडीट लिंक बँक सबसिडी उपलब्ध करून दिल्यास त्यांचा उद्योग विकसित करण्यास मदत होईल म्हणून उद्योग मंत्रालयाद्वारे अश्या गटाना क्रेडीट लिंक सबसिडी,पायाभूत सुविधा व मार्केटिंग आणि ब्राडिंग हे PMFME योजनेतील घटक अभियानाच्या माध्यमातून राबविण्याचे सूचित करण्यात आलेले आहे.

दी.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत कार्यरत समुदाय संघटक व समुदाय संसाधन व्यक्तीमधून PMFME योजनेकरिता RP-DISTRICT RESOURSE PERSON यांची निवड करावयाची आहे. सदर निवड केलेल्या व्यक्तींनी स्वःताचे काम संभाळून RESOURSE PERSON चे काम करायचे आहे. त्यामुळे कुठल्याही नवीन व्यक्तीची RP म्हणून निवड करण्यात येवू नये, असे नमूद केलेलं आहे.

RESOURSE PERSON ची निवड प्रक्रिया ही शहरस्तरीय निवड समिती मार्फत करण्यात यावी यासाठी मानधन रक्कम SNA कडून प्राप्त होणार असून ते प्रस्ताव सादरीकरण व प्रस्ताव मान्यतेनुसार देय असेल. तरी RESOURSE PERSON निवड प्रक्रिया साठी खालील २ उमेदवार इच्छुक आहेत

१. श्रीमती. दर्शना सुरेश टोणगे
२. श्रीमती. सविता सुधाकर जाधव

या दोन उमेदवार काम करण्यास इच्छुक असून २ अर्ज प्राप्त झालेले असून या दोन पैकी एकाची निवड करायची असून सदर निवड प्रक्रिया बाबत कोणाचा आक्षेप असल्यास कार्यालयीन वेळेत ७ दिवसात (दिनांक - ०८/१२/२०२२ ते १६/१२/२०२२ पर्यंत) खोपोली नगरपरिषद DAY-NULM विभागात प्रत्यक्ष येवून लेखी स्वरुपात नोंदवावा त्यानंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**सही/-**
**मुख्यधिकारी**
खोपोली नगरपरिषद



**जाहीर नोटीस**

या नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशील **श्री. प्रकाश रामचंद्र चंदने आणि सौ. प्रिती प्रकाश चंदने** रा. फ्लॅट नं. २, पहिला मजला, सिटी सर्व्हे नंबर १५६२ अ, सागर लक्ष्मी सीएचएस लि, ता. पनवेल, जिल्हा रायगड.

**श्री. प्रकाश रामचंद्र चंदने आणि सौ. प्रिती प्रकाश चंदने** यांनी वरील मिळकत खरेदी केलेली आहे. मिळकतीच्या दस्ता मधील पहिला करार फॉर सेल दिनांक ४/३/१९८७ व सदरील दस्त मेसर्स सागर बिल्डर्स आणि डेव्हलपर्स आणि श्री दामोदर नारायण खोल्लम यांच्यातील असुन तो हरवला आहे. त्याची तक्रार संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये रजि. क्रमांक ०५६३/२०२२ दिनांक २५/११/२०२२ दिली आहे. तरी सदरील दस्त कोणत्याही व्यक्तीस सापडल्यास माझ्या किंवा माझ्या अशिलाच्या पत्तावर देण्यात यावे ही विनंती.

तरी सदर मिळकती बाबत कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे कुठल्याही प्रकारचे दावा हरकती असे विक्री गहाण, ताबा, बक्षीस, भेट, भाडेपट्टा, वारसहक्क लोन, बुकींग किंवा इतर जर असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यावर १४ दिवसांच्या आत दावेशी संबंधीत असलेल्या दस्तऐवजांची प्रमाणीत केलेल्या प्रतीसहीत, आमच्या कार्यालयीन पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, अन्यथा त्यानंतर कुठलेही प्रकारच्या येणाऱ्या हरकती तक्रारीची विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ७/१२/२०२२ सही/-

**ॲड. रेवती के. ठाकूर**
पत्ता: शॉप नं. ३१ सत्यसाई प्लाझा,
प्लॉट नं. ५, मिराझ सिनेमा जवळ,
सेक्टर -११,न्यू पनवेल पूर्व ४१०२०६


# मुंबई-पुणे महामार्गावर तीन वेगवेगळे अपघात

## दोघेजण गंभीर तर अन्य प्रवासी किरकोळ जखमी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर तीन वेगवेगळ्या ठिकाणी अपघात झाल्याने बुधवार (दि. ७) हा अपघात वार ठरला. पहिला अपघात खालापूरनजीक रिंकी पॅलेस हॉटेलजवळ झाला. इको कारच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कारने रस्त्याच्या बाजूला धडक दिली. यात कार चालक गंभीर जखमी झाला तसेच कारमधील अन्य प्रवासी किरकोळ जखमी झाले. त्यांना खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या अपघातात मुंबई-पुणे महामार्गावरील बोरघाटातील अंडा पॉईंटच्या वळणावर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकी रस्त्याच्या कडेला खड्ड्यात पडली. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याला ट्रॉमा केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

समीर आलदर (वय २२, रा. वाशी, नवी मुंबई) हा त्याच्या ताब्यातील दुचाकी (एमएच-४३,सीबी- ७८९२) चालवीत वाशी येथून कार्ला येथील एकविरा देवीच्या दर्शनाला जात होता. बोरघाटातील अंडा पॉईंटच्या वळणावर समोरून येणाऱ्या अनोळखी कारने दुचाकीला धडक दिली. त्यामुळे समीर आलदर याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले व दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्यात पडली. या अपघातात समीर आलदर याच्या उजव्या पायाला गंभीर जखमी झाली असून त्याला ट्रॉमा केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

तिसरा अपघात बुधवारी (दि. ७) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास बोरघाटातील शिंग्रोबा मंदिराच्या मागील रस्त्यावर झाला. गौरव दलाल (रा. कल्याण) हा त्याच्या ताब्यातील सिलेरिओ कार (एमएच-०५, डीएच-४९८१) वरील चालक चालवित लोणावळा बाजूकडून खोपोलीकडे येत होता. शिंग्रोबा मंदिराच्या मागील रस्त्यावर चालक गौरव दलाल याचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला पलटी झाली. यात कोणासाही दुखापत झाली नाही.

# माणगावात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी संतोष गोविंद टेंबे (वय ३२, रा. हातकेळी, ता. माणगांव) याने २९ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास एका अल्पवयीन मुलीला तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेत आपल्या रिक्षेत बसवून निजामपूर रोडला सुमारे एक किलोमीटर अंतरावर नेले. व जंगलभागात रिक्षा थांबवून त्या मुली सोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्तापित केले. तसेच या प्रकाराबाबत कोणाला सांगू नकोस, मी बोलवेन तेव्हा येत जा, नाहीतर तुझे फोटो सर्वांना पाठवेन, अशी धमकी दिली.

या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात भादंविसं कलम ३७६ (२) जे, ३७६ (२) (एन), ५०६, बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४,८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत.

# माणगावातील निकम स्कुलमध्ये विज्ञान प्रदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील एस. एस. निकम इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर सायन्स कॉलेजच्या प्रांगणात शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. वेगवेगळी रसायने वापरून तयार करण्यात आलेले रॉकेट केंद्र प्रमुख संजय निजपकर यांच्या हस्ते हवेमध्ये उडवून या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मदन निकम, सहसचिव विक्रांत सप्रे, संचालक डॉ. श्रुती निकम, शाळेचे को-ओर्डीनेटर विजय पाईकराव, प्राचार्या संगिता कोकाटे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शैलेश जाधव यांच्यासह शिक्षक-पालक संघटनेचे प्रतिनिधी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये पहिली ते ११ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता. यात एकूण ८० प्रतिकृती सादर करण्यात आल्या होत्या. या प्रतिकृतींचे परीक्षण शिक्षक-पालक संघटनेचे सदस्य बाळाराम मुंढे यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करून केलेले कोलाज काम, पपेट, चित्रकला, हस्तकला अशा वेगवेगळ्या प्रकारच्या शोभेच्या वस्तू प्रदर्शनात ठेवण्यात आल्या होत्या. स्पेस रूम व त्यासंदर्भातील रांगोळी हे विज्ञान प्रदर्शनाचे खास आकर्षण होते. विज्ञान विभागाचे प्रमुख तानाजी केवटे यांच्यासह सर्व विज्ञान शिक्षकांनी हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.


**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**नोव्हेंबर २०२२**

| अ. क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | पबीत्र कुमार बेहरा | विनोद यशवंत चव्हाण | सदनिका नं. जे ९०७, नववा मजला, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल३-७१० २०२१ | १२/०१/ २०२१ |
| २ | बाळासाहेब नामदेव माळी सुप्रिया बाळासाहेब माळी | अनिल कुमार | सदनिका नं. बी-२०३, दुसरा मजला पुष्पकलश २ को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल४-१२५ ११-२०२२ | ४/१०/ २०२२ |
| ३ | सुरेंद्र कुमार, बबिता सुरेंद्र कुमार | ॲलीस जॉर्ज मलायकल, ऐलसी बेनीडीक्ट | सदनिका नं. सी-२०४, दुसरा मजला गंगाधाम बि.नं.१, को.हौ.सो. मौजे मौजे पाली देवद (सुकापूर) | पवल३-१७१ २१-२०२२ | १०/१०/ २०२२ |
| ४ | अश्विनकुमार भिमराव अहिरे | संतोष गोविंद घरत, सुवर्णा संतोष घरत | सदनिका नं. ३०२, तिसरा मजला, बी-विंग, निंबेश्वर पार्क को.हौ.सो. मौजे पाली देवद (सुकापूर) | पवल२-१३४ ५६-२०२२ | २७/०९/ २०२२ |
| ५ | निजामुद्दीन मुजावर, शेहनाज निजामुद्दीन मुजावर | इम्पिरीयल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे साजिद नमकवाला | सदनिका नं. ३०३, तिसरा मजला, बि विंग, इम्पिरियल आर्केड, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल५-२९० ८-२०१४ | २३/०४/ २०१४ |
| ६ | अनंत कुमार पुष्पक, संगीता सैनी | दिनेश चंद्रशेखर पाटील, अर्चना दिनेश पाटील | सदनिका नं. बी-१०१, पहिला मजला, गंगाधाम बि.नं.२ को.हौ.सो. मौजे पाली देवद (सुकापूर) | पवल१-१२५ ५९-२०२२ | २८/१०/ २०२२ |
| ७ | नयना अजय जुईकर, अजय हिराजी जुईकर | विलसन चाको फिलीप, शेरली विलसन | सदनिका नं. ०२, तळ मजला, बि.नं. आर ३, श्रीनिवास को.हौ.सो. मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-१०३ ३१-२०२२ | २१/०७/ २०२२ |
| ८ | शरद ज्ञानदेव चाळके, रेखा ज्ञानदेव चाळके, ज्ञानदेव गुंडू चाळके | यशवंत सूर्यकांत बांदेकर, यशश्री यशवंत बांदेकर | सदनिका नं. बी-१०२, पहिला मजला, बि.नं.४, कार्तिक्या पार्क को.हौ. सो.मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल१-६१३ २०२० | २०/०१/ २०२० |
| ९ | सागर सुरेश गायकवाड, प्रियांका सागर गायकवाड | संतोष बळवंत नाईकडे, | सदनिका नं. १०८, पहिला मजला, वैष्णवी आशिर्वाद, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल२-३६७ ८-२०२० | १३/०३/ २०२० |
| १० | विंदू सजीव | राधा शिवरमण तर्फे सुरेश शिवरामण | सदनिका नं. ०७, पहिला मजला, रसिक अपार्टमेंट, जय बालाजी कृपा को.हौ.सो. मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल५-३३८ ४-२०२२ | २८/०२/ २०२२ |
| ११ | दत्तात्रेय बाळाराम ठोंबरे, स्मिता दत्तात्रेय ठोंबरे | अनिल भाईदास वाडिले, | सदनिका नं. ३०२, तिसरा मजला, सी विंग, निंबेश्वर संस्कृती को.हौ.सो. मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल१-१२७ २२-२०२२ | २/११/ २०२२ |
| १२ | चंद्रकांत बाळाराम साळवी, स्वप्ना चंद्रकांत साळवी | मे. देवनदी मर्कंटाईल प्रा. लि. तर्फे डायरेक्टर जुगराज बोहरा | सदनिका नं. ए-००१, तळ मजला, ए विंग, गंगा दर्शन को.हौ.सो., मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल१-१८३ ०-२०२२ | १६/०२/ २०२२ |
| १३ | संजय दिनानाथ गुप्ता | सुमन सिताराम साहू, सिताराम हिरालाल साहू | ग्रा. पं. घर मिळकत क्र. २०५/६/२, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल५-११७ ७५-२०२२ | १५/०७/ २०२२ |
| १४ | तुषार अशोक माळी, नुतन तुषार माळी | मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | सदनिका नं. ए-३०२, तिसरा मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-२११ २-२०२२ | ११/०२/ २०२२ |
| १५ | रमेश सुखदेव करांडे, कविता रमेश करांडे | मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | सदनिका नं. बी-२०१, दुसरा मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल३-२५२ ४-२०२२ | १५/०२/ २०२२ |
| १६ | मिना महेंद्र आलिमकर | मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | सदनिका नं. ए-३०३, ए विंग, तिसरा मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-७३० ८-२०२२ | २०/०५/ २०२२ |
| १७ | रविंद्र अरुण पाटणकर, प्रियांका रविंद्र पाटणकर | मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | सदनिका नं. बी-२०५, बी विंग, दुसरा मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-६५२ -२०२२ | १४/०१/ २०२२ |
| १८ | विकास कोंडिबा कदम, उज्वला विकास कदम | मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | सदनिका नं. बी-४०२, बी विंग, चौथा मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-३९३ १-२०२२ | १६/०३/ २०२२ |
| १९ | सचिन रामचंद्र चव्हाण | मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | सदनिका नं. बी-४०३, बी विंग, चौथा मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-६७ -२०२२ | ४/०१/ २०२२ |
| २० | विलास वसंत मांडवकर , वृषाली विलास मांडवकर | मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | सदनिका नं. बी-४०४, बी विंग, चौथा मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-९३ ९९-२०२२ | ३०/०६/ २०२२ |
| २१ | गोविंद शंकर टेंबे, सुप्रिया गोविंद टेंबे | विकास दत्तु काळे, विशाखा विकास काळे | सदनिका नं. ३०१, ए विंग, तिसरा मजला, गंगाधाम बि.नं.२ को.हौ.सो., मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल१-२२ ६२-२०२२ | २५/०२/ २०२२ |
| २२ | मनिषा जितेंद्र कांबळे | राजेंद्र एकनाथ भोसले | सदनिका नं. डी २०२, दुसरा मजला, बि.नं.१ स्वर्णभूमी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल२-१५२ ८५-२०१२ | ३/११/ २०२२ |
| २३ | हेरमस फरनांडो | उत्तम सी. कांबळे | सदनिका नं. ६, तळ मजला, साहिल अपार्टमेंट को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल१-०४५ ७३-२०१२ | १२/०४/ २०१२ |
| २४ | के. के. शाजी | बाळू पांडुरंग साळवे | सदनिका नं. बी २०१, दुसरा मजला, बि.नं.१ गोकुळदास कॉम्प्लेक्स को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल२-१६४ ७८-२०२१ | ३०/११/ २०२१ |
| २५ | कविता राकेश धुरी | रविंद्र कृष्णा पाटील | सदनिका नं. डी १०४, पहिला मजला, गंगा गणेश को.हौ.सो., मौजे पाली देवद (सुकापूर) | पवल४-१२५ २५-२०२२ | ४/१०/ २०२२ |
| २६ | उमेश यशवंत खाडे, वैशाली वसंत खाडे | गणेश चंद्रकांत धुरे, ज्ञानेश्वर रामचंद्र घाडी | सदनिका नं. ३०२, तिसला मजला, देवी दर्शन रेसिडेन्सी को.हौ.सो., मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल५-१७७ ९७-२०२२ | ७/११/ २०२२ |
| २७ | जयेश्वर धुंडीराज अटाळे | अनिकेत पांडुरंग थोरात | सदनिका नं. ०८, पहिला मजला, ए विंग, बि.नं.३ साई समर्थ को.हौ. सो., मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल१-२५ ४३-२०१६ | १/०४/ २०१६ |
| २८ | ताजुद्दीन जलालद्दीन खान | आयकॉन स्पेस डेव्हलपर्स, (पहिले मालक), सीमा संजय रांजणे (दुसरे मालक) | सदनिका नं. ३०१, तिसरा मजला, एफ विंग, साई एन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल३-१८८ ४८-२०२२ | १०/११/ २०२२ |
| २९ | रेश्मा संतोष कुमार पिल्लई | महादेव मनोहर दळवी | सदनिका नं. ७, पहीला मजला, सरस्वती को.हौ.सो., मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल२-१७७ ३५-२०२२ | २८/०८/ २०२२ |
| ३० | गोपाल सिंह हिरा सिंह खरवड | अतुल बुद्धजन जाधव | शॉप नं. ४, तळ मजला, पुष्प कलश २ को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल५-९० ७८-२०१६ | ३१/०५/ २०२२ |
| ३१ | विनोद विठ्ठल कोल्हटकर, प्रतिभा विनोद कोल्हटकर | शिल्पा रोहन विरकर, मंजू वसंत पुरोहित | सदनिका नं. १०५, पहिला मजला, ए विंग, बि.नं.५, साक्षी पार्क को.हौ. सो., मौजे शिलोत्तर रायचूर(सुकापूर) | पवल२-८१ १४-२०२२ | ६/०६/ २०२२ |
| ३२ | अरुण मणिराम राठोड, संगिता अरूण राठोड | प्रिया प्रवीण अमृतसागर | सदनिका नं. १०१, पहिला मजला, ए विंग, बि.नं.१, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल५-१५३ ९९-२०२२ | २२/०९/ २०२२ |
| ३३ | प्रफुल्ल ज्ञानेश्वर इंदुलकर, दिपिका ज्ञानेश्वर इंदुलकर | दिपक एस गोम्स, टीना दिपक गोम्स | सदनिका नं. ३०४, तिसरा मजला, एफ विंग, बि.नं.४, साई एन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल५-१७३ ६६-२०२२ | २८/१०/ २०२२ |
| ३४ | सागर लालासो चव्हाण, रश्मी सागर चव्हाण | गेहरसिंह रामसिंह परमार | सदनिका नं. २/४, दुसरा मजला, बि.नं.७, वृंदावन बिल्डींग, बसंत को.हौ.सो., मौजे पाली देवद (सुकापूर) | पवल२-७६ ९८-२०२१ | २/६/ २०२१ |
| ३५ | प्रवीण प्रजेश | शांता सुब्रमण्यम | सदनिका नं. ७, महिला मजला, बि.नं.१, स्नेहमिलन को.हौ.सो., मौजे पाली देवद (सुकापूर) | पवल४-१०८ ८५-२०२२ | २४/८/ २०२२ |
| ३६ | रेणू राजेश शर्मा, राजेश शर्मा | अरुण शंकर गांवकर | सदनिका नं. २०४, दुसरा मजला, जी विंग, जम्नोत्री सागर को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल१-३१ ११-२०२२ | १७/०३/ २०२२ |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# मुरूडमध्ये चार सरपंच पदासाठी १३ तर ग्रामपंचायत सदस्य पदाच्या ३२ जागांसाठी ७१ उमेदवार

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्यातील थेट सरपंच पदाकरिता २४ तर सदस्यपदासाठी ११७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. बुधवारी (दि. ७) अर्ज मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी सरपंचपदाचे ११ तर सदस्य पदाचे ४६ उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले.

मुरूड तहसीलदार कार्यालयासमोरील दरबार हॉलमध्ये बुधवारी सकाळी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी गर्दी झाली होती. काकळघर ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदाचे चार तर सदस्य पदाचे २० उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. त्यामुळे काकळघर ग्रामपंचायतीच्या सदस्य पदाच्या नऊ जागांसाठी १९ तर थेट सरपंच पदाकरिता चार उमेदवार रिंगणात आहेत.




कार्लेई ग्रामपंचायतीमध्ये सदस्य पदाचे १४ तर सरपंच पदाचे चार उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. त्यामुळे तेथे थेट सरपंच पदासाठी चौरंगी लढत होणार आहे तर नऊ सदस्यांसाठी २३ उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत.

वावडुंगी ग्रामपंचायतीमध्ये सदस्य पदाचे दोन उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आल्याने आता तेथील सात सदस्यांसाठी नऊ उमेदवार नशीब आजमावित आहेत. तर थेट सरपंच पदासाठी दुरंगी लढत होणार आहे.

वेळास्ते ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदाचे तीन तर सदस्य पदाचे चार अर्ज बुधवारी मागे घेण्यात आले. आता तेथे सदस्य पदाच्या सात जागांसाठी १४ तर सरपंच पदाकरीता दोन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

तेलवडे ग्रामपंचायतीमध्ये सदस्य पदाचे पाच उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. त्यामुळे जेव्हढ्या जागा तेव्हढेच उमेदवार झाल्याने तेलवडे ग्रामपंचायत बिनविरोध झाली आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर मुरूडचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार रोहन शिंदे व निवडणूक नायब तहसीलदार अमित पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच व सदस्य पदाच्या उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात आले.



# बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरीत सुरू करा

## रोहा ज्वेलर्स असोसिएशनचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**रोहे : प्रतिनिधी**

शहरातील बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरीत सुरू करा, अशी मागणी रोहा-कोलाड ज्वेलर्स असोसिएशनने मंगळवारी (दि. ६) रोहा अष्टमी नगर परिषदच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली.

रोह्यात नुकतेच ज्वेलर्सचे दुकान फोडून सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडल्याने सराफा व्यावसायिकांत भितीचे वातावरण आहे. दरम्यान, रोहे नगर परिषद हद्दीतील २७ पैकी २६ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे निदर्शनास आल्याने या व्यावसायिकांच्या चिंतेमध्ये वाढ झाली आहे. शहरातील बंद असलेले कॅमेरे लवकर सुरू करण्यात यावेत, असे रोहा-कोलाड ज्वेलर्स असोसिएशनने रोहा नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

रोहा कोलाड ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष राकेश जैन, सेक्रेटरी मनोज जैन, खजिनदार भरत जैन, वस्तीमल जैन, सौरभ पोतदार, रितेश जैन, परेश जैन, राहुल जैन यांच्यासह ज्वेलर्स बांधव मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

# भडवळ येथील आरोग्य तपासणी शिबिर

## ३६ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कर्जत तालुक्यातील भडवळ गावात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तीनशेहून रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या वेळी मोतीबिंदू आढळलेल्या ३६ रुग्णांना शस्त्रक्रिया करण्यासाठी नवीन पनवेल येथील संकरा आय हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे.

नवीन पनवेल येथील संकरा आय हॉस्पिटल, पनवेल येथील सुश्रुषा हॉस्पिटल आणि सु जोक ॲक्युप्रेशर आणि ॲक्युपंक्चर थेरपी तसेच मुंबई येथील युवक प्रतिष्ठान आणि हार्मोनी फाउंडेशन यांच्या माध्यमातून भडवळ गावातील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर यांचे हस्ते झाले. त्या वेळी कर्जत पंचायत समितीचे माजी सदस्य नरेश मसणे, भाजपचे तालुका सरचिटणीस संजय कराळे, कर्जत शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, नेरळ शहर महिला मोर्चा अध्यक्ष नम्रता कांदळगावकर, दामत ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुभाष मिणमिने, गोपीनाथ राणे, ग्रामपंचायत सदस्य किशोर घारे, महात्मा गांधी तंटा मुक्त समिती अध्यक्ष महेश जामघरे, नेरळ भाजप माजी अध्यक्ष अनिल जैन, अनिल मराडे, प्रभाकर पाटील, मिलन पाटील, सागर कालेकर,



कमलाकर मेंगाळ, सलमान नजे आदी उपस्थित होते.

शिबिराचे आयोजक हार्मोनी फाउंडेशनचे नितीन कांदळगावकर यांनी स्वागत केले. या शिबिरात १६० रुग्णांची नेत्र चिकित्सा करण्यात आली, त्यात ३६ रुग्णांना मोतीबिंदू दोष आढळले. या शिबिरात ५८ रुग्णांनी आपली बीपी, शुगर, ईसीजी तपासणी करून घेतली. शिबिरात निल किरीट सोमय्या यांच्या युवक प्रतिष्ठान तर्फे अल्पदरात श्रवणयंत्रे उपलब्ध करून देण्यात आली होती, त्याचा लाभ १४ जणांनी घेतला. तर १०० हुन अधिक रुग्णांची ॲक्युप्रेशर आणि ॲक्युपंक्चर तपासणी करण्यात आली.

नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शिबिरासाठी प्रकाश पाटील, सिमरन दीप कौर, परिचारिका समृद्धी साळवी, लवप्रित कौर, व्यंकटेश अय्यर आणि नरेश औलार हे व्हिजन टेक्निशियन उपस्थित होते. सुश्रुषा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडून डॉ. झीनत, टीम कोऑरडीनेटर जयदास जाधव, आरोग्य कर्मचारी आणि युवक प्रतिष्ठानकडून उषा घोरपडे आणि नितीश मिश्रा हे वैद्यकीय सहाय्यक उपस्थित होते. ॲक्युप्रेशर व ॲक्युपंचर तपासणी वैद्य मिलिंद पटवर्धन व सहकारी तसनीम आणि दक्षा यांनी केली. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रसन्न पाटील, सोमनाथ जामघरे, योगेश पाटील, शरद मुरबे, मनोज जामघरे यांच्यासह भारतीय जनता पार्टी भडवळ शाखेचे विशेष सहकार्य लाभले.

## पोलादपुरमध्ये ४८ जणांचे रक्तदान

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

सुजय प्रतिष्ठान आणि मैत्री रक्ताची या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पोलादपूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या कातळी खडकवणे येथे मंगळवारी (दि. ६) आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात ४८ जणांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या रक्तदान शिबिराला पोलीस उपनिरीक्षक सोपान कदम, गुरुवर्य दादा महाराज मोरे, आदर्श शिक्षिका शारदा खारपाटील, अंकुश महाराज कुमठेकर, निवृत्ती कदम, अनंत जाधव, मनोहर सकपाळ, जनार्दन कदम आदी उपस्थित होते. मैत्री रक्ताची या संस्थेचे अध्यक्ष सुरेश सकपाळ, सदस्य अजय सकपाळ यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ मंडळ, सुजय प्रतिष्ठानच्या सदस्यांनी हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# तळा मेट मोहल्ला येथे कव्वालीचा जंगी सामना

**माणगाव : प्रतिनिधी**

वली हजरत जारसेवल्ली शाहबाबा रहमतुल्ला आल्या यांचा उर्स शरीफ गुरुवारी होणार आहे. त्या निमित्त तळा मेट मोहल्ला येथे शुक्रवारी (दि. ९) रात्री ९.३० वाजता शहेनशाहे गजलकार जनाब-मुराद अतिश आणि मालिकाए तरन्नुम छोटी शबनम यांच्या कव्वालीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी या कव्वालीचा व उर्सचा आनंद घ्यावा, असे आवाहन उर्स इनतजमिया कमिटीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated Cost | EMD in Rs. | Tender Fee in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/EHV(O&M)/cir/ PNL/e-Tender53/ 2022-23 **RFx No. 7000025130** | Work of Electrical Safety, Fire Safety & Security Audit at various substations under EHV O&M Circle, Panvel | Rs. 5.38 Lakh | 1% of Estimated Cost | 500/-+ GST |

**Submission of Bids:** From 07.12.2022 to 14.12.2022 up to 23:59 Hrs **Bid Opening Date and Time:** 15.12.2022 at 11:00 Hrs (Technical) and at 15:00 Hrs (Commercial) if possible. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mr. Jawaharlal Holikar, The Executive Engineer (Adm), Mob. No. +91 9167368574 Tel. No. 022-27459624/25 **Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**


# खोपोलीमध्ये नवमतदार नोंदणीसाठी विशेष शिबिर

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तहसील कार्यालय आणि केएमसी कॉलेज- खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करण्यासाठी केएमसी कॉलेज विशेष शिबिर घेण्यात आले. या शिबिरात पात्र नवमतदारांची मतदार नोंदणी करण्याकामी अर्ज भरुन घेण्यात आले.

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे यांच्या आदेशान्वये व कर्जत विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी अजित नैराळे यांच्या सूचनेप्रमाणे तसेच खालापूरचे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी आयुब तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोलीतील केएमसी कॉलेजमध्ये विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. खालापूरचे नायब तहसीलदार (निवडणूक) दशरथ भोईर, खोपोली मंडळ अधिकारी सचिन वाघ, तलाठी रणजीत कवडे, दिप्ती चोणकर, गटशिक्षण अधिकारी शिल्पा दास, केएमसी कॉलेजचे प्राचार्य प्रताप पाटील, प्रा. संजय दायरे, प्रा. मीनाक्षी ओसवाल या वेळी उपस्थित होते.

नायब तहसीलदार दशरथ भोईर यांनी मतदार नोंदणी कशी करावी, या बाबत विद्यार्थ्यांना मागदर्शन केले. तसेच मतदानाचे महत्त्व, छतड्ड झ्रीेरश्र व व्होटर हेल्पलाईन ॲपबाबत मागदर्शन केले.



## मांजरवणे मोहल्यातील तरूणांनी जोपासला स्वच्छतेचा वसा

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील मांजरवणे मोहल्ला येथील तरुणांनी मांजरवणे ते रानवडे या रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत व छोटी अनावश्यक झाडे, वेली तोडून स्वच्छतेचा वारसा जपला आहे.

मांजरवणे ते रानवडे या रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडीमुळे वाहन चालकांना पुढील वाहनांचा अंदाज येत नाही. त्यामुळे सातत्याने अपघात होत होते. परिसरही अस्वच्छ दिसत होता. मांजरवणे गावाचे पोलीस पाटील जलील फिरफिरे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहल्ल्यातील आदिब सनगे, शादाब सनगे, अमीर टोळकर, आजम वलिले यांच्यासह अनेक तरुणांनी रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत व छोटी अनावश्यक झाडे, वेली तोडून स्वच्छतेमुळे वळणावरील वाहनं दूरवरून दिसू लागली आहेत. या तरुणांच्या कामाचे पंचक्रोशीत कौतुक होत आहे.

# कन्यादान योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करावेत

## प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प-पेण अंतर्गत रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दांपत्याकरिता तसेच स्थानिक स्वराज्य संस्था व नामांकित स्वयंसेवी संस्थाकडून कन्यादान योजनेसाठी अर्ज मागवण्यात येत आहेत.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या दाम्पत्याने योग्य त्या कागदपत्रासह ७ डिसेंबर २०२२ पासून विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना १० हजार रुपये अनुदान देय आहे. तसेच लग्न सोहळा आयोजित करण्यासाठी सेवाभावी संस्था तयार असल्यास कार्यक्रम आयोजन करण्यासाठी १० हजार रुपये अनुदान देय आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदारांनी विहीत नमुन्यातील कन्यादान योजनेचा अर्ज, दोन पासपोर्ट साईज फोटो, रहिवाशी दाखला, जातीचे दाखले, वयाबाबतचे शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला, विवाह न झाल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र १०० रुपयांच्या स्टॅम्पवर नमूद करावे. लाभार्थ्यांना विहित नमुन्यातील अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण, जि.रायगड या कार्यालयातील कन्यादान योजना कक्षाकडून उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

कन्यादान योजनेचा लाभ जास्तीत जास्त अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांनी घ्यावा व या योजनेकरिता अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प-पेण शशिकला अहिरराव यांनी केले आहे.

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ५८ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कांदळगांव शिरवली जिते रस्ता प्रजिमा ६१ कि.मी. ६/०० ते ८/०० मध्ये रूंदीकरण व डांबरीकरण करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | ९९४४०२५ | १००००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | साखर तळ्याचीवाडी ते गोवेले रस्ता प्रजिमा १०० कि.मी. ६/०० ते ६/५०० वरील वळणाची सुधारण करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | ७९९५०८४ | ८०००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ३ | पोलादपूर तालुक्यातील पोलादपुर देवपुर गोळेगणी कुडपन रस्ता प्रजिमा ७१ कि.मी. ६/५०० ते ८/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | ७८२६३७४ | ८०००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ४ | पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर देवपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. २२/३१५ मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०३) | ७९४८२९७ | ८०००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ५ | पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. १३/३०० मध्ये मोरीचे संरक्षक भिंतीसह बांधकाम करणे. (५०५४, ०३) | ७९१०३८८ | ८०००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ६ | पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर महाबळेश्वर वाई सूरूर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. १०/००ते १०/५०० मध्ये मोरीचे संरक्षक भिंतीसह बांधकाम करणे. (५०५४,०३) | ४७३६७७९ | ४८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | खरवली पेण उसर पन्हेली रस्ता प्रजिमा- ६० कि.मी. ८/६०० मधील स्लॅब ड्रेनची पुर्नबांधणी करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | ५११०७५९ | ५२००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ८ | खरवली पेण उसर पन्हेली रस्ता प्रजिमा- ६० कि.मी. ८/३१० मधील स्लॅब ड्रेनची पुर्नबांधणी करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | ५०५३०२९ | ५१००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ९ | खरवली पेण उसर पन्हेली रस्ता प्रजिमा- ६० कि.मी. ६/४०० मधील स्लॅब ड्रेनची पुर्नबांधणी करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | ५०५८५२६ | ५१००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १० | निजामपुर पुलापासुन ते कोशिंबळे आदिवासी रस्ता ग्रामा- २३३ कि.मी. ०/० ते २/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | ३११४३६८ | ३२००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ११ | नेराव सुतारवाडी ते उड्डेवाडी रस्ता ग्रामा- ९१ कि.मी. ०/० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | ६०६०८३० | ६१००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १२ | साळवे जोड रस्ता ग्रामा-५१ कि.मी. ०/० ते १/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | १७७५४६८ | १८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १३ | ग्रामपंचायत पाटणसई अंतर्गत पाटणसई ते आदिवासीवाडी रस्ता तयार करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (२५१५ ग्रामीण रस्ते) | १६२००१८ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १४ | ग्रामपंचायत ऐनघर अंतर्गत हेदवली ते तामसोली रस्ता तयार करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (२५१५ ग्रामीण रस्ते) | २०२४८४६ | २१००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १५ | ग्रामपंचायत ऐनघर अंतर्गत तामसोली ते हेदवली रस्ता तयार करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (२५१५ ग्रामीण रस्ते) | २०१८६४५ | २१००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १६ | ग्रा.पं.निजामपूर ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | १७८११४४ | सु बे अ | ५९०/- | ६ महिने | सु बे अ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०९/१२/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१६/१२/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक **१९/१२/२०२२** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५०१९**
**दिनांक : ०१/१२/२०२२**

### राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# मुंबई उपनगरला विजेतेपदाचा मुकुट

**परभणी : प्रतिनिधी**

मुंबई उपनगरने ४९व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत दोन्ही विभागात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट मिळविला.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने परभणी जिल्हा कबड्डी असोसिएशनने मातोश्री दगडूबाई गुट्टे प्रतिष्ठानच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले होते. गंगाखेड-परभणी येथील स्व. माणिकराव गुट्टे क्रीडानगरीत झालेल्या मुलींच्या अंतिम सामन्यात मुंबई उपनगरने चुरशीच्या लढतीत पुण्याचे आव्हान ३५-३३ असे परतवीत क्रीडा शिक्षक स्व. चंदन सखाराम पांडे चषकावर आपले नाव कोरले.



पहिल्या चढाईपासून सामन्याला बरोबरीने सुरुवात झाली. विश्रांतीला दोन्ही संघ १४-१४ अशी बरोबरी होती. विश्रांतीनंतर काहीच मिनिटांत उपनगरने पुण्यावर लोण देत २३-२१ अशी आघाडी घेतली, पण पुन्हा एकदा २३-२३ अशी बरोबरी झाली. शेवटची पाच मिनिटे पुकारली, तेव्हा २६-२५ अशी उपनगरकडे आघाडी होती, पण संयमाने खेळ करीत उपनगरने दोन गुणाने बाजी मारली. मंदिरा कोमकर, निकिता पडवळ, गौरी तांडकर यांच्या आक्रमक खेळाच्या बळावर सामन्याच्या सुरुवातीला आघाडी राखणाऱ्या पुण्याला उत्तरार्धात मात्र आपला खेळ उंचावता आला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा पुण्याला उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले.

या अगोदर झालेल्या कुमारांच्या उपांत्य सामन्यात मुंबई उपनगरने पुण्याला २६-२२ असे, तर अहमदनगरने ठाण्याला ३२-२४ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती, तर कुमारी गटात मुंबई उपनगरने यजमान परभणीला ४८-३२ असे, तर पुण्याने मुंबई शहरला ५१-३२ असे नमवित अंतिम फेरी गाठली होती. स्पर्धेचे बक्षीस वितरण राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे व आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते झाले. राज्य कबड्डी असोसिएशनने या स्पर्धेत प्रथमच जिल्हा संघांना रिव्ह्यू घेण्याची संधी दिली.

# मीराबाई चानूने ऑलिम्पिक विजेतीला दिली मात

## वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये उचलले २०० किलो

**टोकियो : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानूने २०२२च्या जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत कोलंबियामध्ये चीनच्या हौ झिहुआला पराभूत करून रौप्यपदक जिंकले आहे. टोकियो २०२० चॅम्पियन चीनच्या हौ झिहुआसमोर मीराबाईच्या शक्तीचा कस लागला, पण अखेरीस मीराबाई चानूने मीराबाईचे हे वर्ल्ड चॅम्पियनशिपमधील दुसरे पदक आपल्या नावे केले आहे. दरम्यान, चीनच्या जियांग हुइहुआने २०६ किलो (स्नॅचमध्ये ९३ किलो आणि जर्कमध्ये ११३ किलो) एकत्रित वजन उचलून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे.



प्राप्त माहितीनुसार चीनच्या झिहुआने एकूण १९८ किलो (स्नॅचमध्ये ८९ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये १०९ किलो) वजन उचलले होते. या रेकॉर्डला टक्कर देत मीराबाईने तब्बल २०० किलो (स्नॅचमध्ये ८७ किलो आणि क्लीन जर्कमध्ये ११३ किलो) वजन उचलले होते. मीराबाईने वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये यापूर्वी २०१७मध्ये १९४ किलो (८५ किलो स्नॅच व क्लीन जर्कमध्ये १०९ किलो) वजन उचलून सुवर्णपदक जिंकले होते.

मीराबाईने नुकतेच राष्ट्रकुल २०२२ स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. राष्ट्रकुल स्पर्धेत मीराबाईने स्नॅचमध्ये ८५ किलो वजन उचलून संथ सुरुवात केली. दुसऱ्या क्लीन अँड जर्क प्रयत्नात संघर्ष करावा लागला, पण तिने वेळ सावरून एकत्रित एकूण ११३ किलो वजन पूर्ण केले आणि क्लीन अँड जर्कमध्ये जियांगशी बरोबरी साधली.

## राष्ट्रीय टेनिसबॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेसाठी रायगडच्या दोन खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड




**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जम्मू येथे होणाऱ्या सिनिअर राष्ट्रीय टेनिसबॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेसाठी रायगडमधील हर्षल नरेश म्हात्रे व सचिन रमेश म्हात्रे या दोन खेळाडूंची निवड महाराष्ट्र संघात झाली आहे. ही स्पर्धा ८ ते ११ डिसेंबरदरम्यान होणार आहे.

हे दोन्ही खेळाडू वाशी विभाग, पेण खारेपाट या ग्रामीण भागातील असून त्यांचे क्रिकेटवर असलेले नितांत प्रेम, खेळातील कौशल्य, मेहनत,जिद्द, चिकाटीमुळेच राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारू शकले. या यशाबद्दल रायगड जिल्हा टेनिसबॉल क्रिकेट संघटनेचे सचिव, संदीप गुरव यांनी संघटनेच्या वतीने दोन्ही खेळाडूंना व त्यांचे प्रशिक्षक महेश म्हात्रे यांना गौरविण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.

## शालेय सांघिक कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

कॅरमप्रेमी स्व. प्रल्हाद नलावडे यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त शालेय संघांची सांघिक कॅरम स्पर्धा २७ ते ३१ डिसेंबर दरम्यान मोफत कॅरम प्रशिक्षणासह आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेत प्रत्येक फेरीमध्ये तीन एकेरी सामने होऊन दोन एकेरी सामने जिंकणारा संघ पुढील फेरीसाठी पात्र ठरेल. मुलेमुली किंवा मिश्र अशा चार खेळाडूंचा शालेय संघ राहील. इच्छुक संघांनी कॅरमपटू प्रशिक्षक सचिन शिंदे (७३०२४ ९७४५८) अथवा कॅरम संघटक चंद्रकांत करंगुटकर (९९८७८३१६२२) यांच्याकडे ८ डिसेंबरपर्यंत संपर्क साधावा.

## दिव्यांग मुलांसाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून राजिप समाज कल्याण विभाग व आई डे केअर संस्था पेण यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग मुलांसाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा भरवण्यात आल्या.

या वेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी नितीन मंडलिक, विभाग सल्लागार किशोर वेखंडे, आई डे केअर संस्थेच्या अध्यक्षा प्रेमलता पाटील, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, स्पीच थेरपीस्ट डॉ. सावनी गोडबोले, फिजिओथेरपीस्ट अमलु विल्सन, बालकल्याण समिती सदस्य डॉ. नीता कदम, इनरव्हील क्लब ऑफ पनवेल प्रेसिडेंट संजीवनी मालवणकर, इनरव्हील क्लब ऑफ पेण प्रेसिडेंट तन्वी हजारे,



इनरव्हील क्लब ऑफ खोपोली प्रेसिडेंट सारिका धोत्रे, इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे मिड वेस्टच्या प्रेसिडेंट जयश्री कपाडिया आणि त्यांचे इनर व्हील मेंबर्स, अँड ऑल आई डे केअर केअर संस्थेचे विशेष विद्यार्थी अनिकेत, सुयोग, आर्या, चेतन या सर्वांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

स्पर्धेसाठी जिल्ह्यामधून एकूण १६ शाळा व ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये १०० मीटर व ५० मीटर धावणे, ५० मीटर व २५ मीटर चालणे, लाँग जंप, स्पॉट जंप, गोळा फेक, सॉफ्ट बॉल थ्रो, बादलीत बॉल टाकणे या स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धेसाठी उपस्थित क्रीडा शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या वेळी इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या प्रेसिडेंट संजीवनी मालवणकर यांनी ११ हजारांचा धनादेश आई डे केअर संस्थेच्या अध्यक्षा प्रेम लता पाटील यांच्या हाती सुपूर्द केला.

रामेश्वर कन्स्ट्रक्शनचे राजू पिचिका, पेण नगरपालिका सीईओ जीवन पाटील, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, गॅलेक्सी सरफॅकटेंट कंपनीचे पुरुषोत्तम पवार, रोटरी क्लब ऑफ पेण ओरायनच्या अध्यक्षा डॉ. सोनाली आणि डॉ. मनीष वनगे, मनोज मेस्त्री, डॉ. रूपाली आणि रुपेश कदम, राजेश महाळकर इतर मान्यवर उपस्थित होते. बक्षीस वितरण हायकल कंपनीच्या वसुधा चंद्रा, लिना बाफणा, आई डे केअरच्या अध्यक्षा प्रेमलता रुपेश पाटील, सेक्रेटरी अॅड. सतीश म्हात्रे, संजय ठाकूर, सदस्य संतोष चव्हाण, महेंद्र मोहिते, कार्याध्यक्षा स्वाती मोहिते, उपमुख्याध्यापिका विद्या खराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# पोर्तुगाल उपांत्यपूर्व फेरीत दाखल

## २१ वर्षीय गोनकॅलो रामोसची हॅट्ट्रीक

**कतार : वृत्तसंस्था**

पोर्तुगालच्या संघाने बुधवारी विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत थाटात प्रवेश केला. स्वित्झर्लंडविरुद्धच्या सामन्यामध्ये अर्धा डझन गोल करत पोर्तुगालने उपांत्यपूर्व फेरी गाठली. विशेष म्हणजे या विजयाचा शिल्पकार ठरला क्रिस्तियानो रोनाल्डोच्या जागी संघात स्थान मिळवलेला २१ वर्षीय गोनकॅलो रामोस. रामोसने या सामन्यामध्ये हॅट्ट्रीक केली. त्याचबरोबर पोर्तुगालचा स्ट्राइकर पेपे, राफाल गुरीरो, राफाल लॅओ यांनी प्रत्येकी एक गोल केला.



पोर्तुगालचा स्टार खेळाडू रोनाल्डोला बेंचवर बसवण्याचा निर्णय संघ व्यवस्थापनाने घेतल्याने रोनाल्डोशिवाय खेळताना संघाच्या कामगिरीकडे लक्ष लागले होते. जो फेलिक्सने पोर्तुगालकडून पहिल्यांदा गोल करण्याचा प्रयत्न केला. ब्रुनो फर्नांडिसला उत्तम पास जोने केला, मात्र ब्रुनोला चेंडूवर नियंत्रण ठेवता आले नाही.

सामन्याच्या नवव्या मिनिटाला स्वित्झर्लंडच्या ब्रिल एम्बोलोने गोल करण्याचा प्रयत्न केला. त्याला बचावफळीतील दोन खेळाडूंना चकवा देण्यातही यश आले, पण पेपेने त्यांच्याकडून चेंडूचा ताबा मिळवला आणि स्वित्झर्लंडचा दुसरा प्रयत्नही फसला. पहिल्या १३-१४ मिनिटांमध्ये गोलपोस्टवर केवळ एक गोल डागण्याचा प्रयत्न झाल्याने सामन्याला संथ सुरुवात झाली.

१७व्या मिनिटाला पोर्तुगालने सामन्यात आघाडी घेतली. गोनकॅलो रामोसला जो फेलिक्सने केलेला पास त्याने गोलमध्ये धाडला. या गोलचा अँगल चांगलाच चर्चेत राहिला. गोलपोस्टच्या बारजवळून चेंडू अलगद जाळ्यात स्थिरावला. त्यानंतर पेपेने ३३व्या मिनिटाला गोल करत पोर्तुलगाची आघाडी २-०वर नेली. मध्यंतरापर्यंत पोर्तुगालचा संघ दोन गोल्सने आघाडीवर होता तर स्वित्झर्लंडच्या खात्यावरही एकही गोल नव्हता.

मध्यंतरानंतर सामना सुरू झाल्यानंतर सहव्याच मिनिटाला गोनकॅलो रामोसने सामन्यातील आपला दुसरा आणि संघासाठी तिसरा गोल गेला. त्यानंतर ५५व्या मिनिटाला गोनकॅलो रामोसचा सहकारी राफाल गुरीरोने गोल करत पोर्तुलागची आघाडी ४-०वर नेली. सामन्यातील ५८व्या मिनिटाला स्वित्झर्लंडला भोपळा फोडण्यात यश आले, मात्र स्वित्झर्लंडचा हा आनंद फार काळ टीकला नाही कारण उर्वरित सामन्यामध्ये पोर्तुगालने दोन गोलची भर घातली आणि स्वित्झर्लंडला एकही गोल करता आला नाही.

पोर्तुगालसाठी पाचवा गोल गोनकॅलो रामोसनेच केला. ६७व्या मिनिटाला गोल करत गोनकॅलो रामोसने हॅट-ट्रीक केली. पेले यांच्यानंतर सर्वात कमी वयात विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत हॅट्ट्रीक करणारा गोनकॅलो रामोस हा दुसरा सर्वात तरुण खेळाडू ठरला.

सामन्यामधील ९० मिनिटांच्या खेळानंतरच्या अतिरिक्त वेळातही पोर्तुगालने गोल केला. सामना संपल्याची घोषणा झाली तेव्हा हाच अंतिम स्कोअर ठरला. आता उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोर्तुगालचा सामना मोरक्कोशी होणार आहे.







**पनवेल :** भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नेरे ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री म्हसकर, माजी पं. स. सदस्य राज पाटील यांच्या नेतृत्वाखाली नेरे ग्रामपंचायतीवर भाजपचे तीन सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. प्रभाग क्रमांक २मधून राम परशुराम पाटील, नीलिमा निलेश पाटील व प्रभाग क्रमांक ३ मधून वंदना गोपाळ रोडपालकर या बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांचे भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन केले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील उपस्थित होते.

## अविराजने गावडेची नव्या विक्रमाला गवसणी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे येथील आंतरमहाविद्यालय क्रिकेट स्पर्धेत रत्नागिरीच्या अविराजने गावडे याने एमआयटी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट लोणी या महाविद्यालयाविरुद्ध सामन्यात दोन षटकांत एकही धाव न देता नऊ विकेट घेत नव्या विक्रमाला गवसणी घातली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षांखालील लीग स्पर्धेत सुमारे ८१ बळी मिळवून त्याने रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. यापूर्वी हे रेकॉर्ड ५६ बळींचे होते. या व्यतिरिक्त विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये ऑलराउंडर कामगिरी करत अविराजने साऱ्यांची मने जिंकून घेतली. त्याने केलेल्या कामगिरीची दखल घेण्यात आली असून, त्याची अंडर वर्षाखालील गटात भारताच्या पश्चिम विभाग क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली होती.

सध्या पुणे येथे आंतरमहाविद्यालय क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. अविराज गावडे हा राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज लांडेवाडी, भोसरी या संघातून खेळत आहे.



**पनवेल :** श्रीदत्त जयंतीनिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी तालुक्यातील विविध कार्यक्रमांना सदिच्छा भेट देऊन श्री दत्तगुरुंचे दर्शन घेतले. वावंजे येथील श्री दत्त मंदिरात होणाऱ्या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांचे ग्रामस्थ मंडळातर्फे स्वागत करण्यात आले. या वेळी पदाधिकारी व भक्तगण उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com